THIS IS A SAMPLE PDF

Balbharati Regd. Licence No.
2018MH0024

Based on the New Syllabus

निगम

# मराठी सुलभभारती (L.L.)

## व्याकरण व लेखन

Marathi Sulabhbharati (L.L.)
Grammar and Writing Skills (Text-cum Workbook)

© SHETH Publishing House

इयत्ता आठवी

SHETH

54121381948

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

Balbharati Regd. Licence No. 2018MH0024

Based on the new syllabus

निगम

# मराठी सुलभभारती (L.L.)

## व्याकरण व लेखन

Marathi Sulabhbharati (L.L.)

Grammar and Writing Skills (Text-cum Workbook)

इयत्ता आठवी

लेखिका: रेणुका देव

Concepts & Designs
Vhs Editorial
vhs.editorial1@gmail.com

SHETH Publishing House
Educational Publishers

© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## निवेदन

महाराष्ट्र माध्यमिक मंडळाने तयार केलेला सुधारित अभ्यासक्रम लक्षात घेऊन **निगम मराठी सुलभभारती (L.L.) व्याकरण व लेखन** Marathi Sulabhbharati (L.L.) Grammar and Writing Skills (Text-cum Workbook) हे पुस्तक तयार केले आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांना, पालकांना व शिक्षकांनाही उपयुक्त ठरेल अशी खात्री आहे.

**आठवीचा** व्याकरणाचा अभ्यासक्रम लक्षात घेऊन पाठ्यपुस्तकातील पाठांवर आधारित आवश्यक तेवढे व्याकरण, निबंध लेखन, कथालेखन, चित्रावरून गोष्ट, चित्रवर्णन, पत्रलेखन, आणि उतारा आकलन उदाहरणांच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे. तसेच व्याकरणावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी पुरेशी जागा देण्यात आली आहे. पुस्तकाच्या शेवटी व्याकरणावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा समावेश करण्यात आला आहे.

व्याकरण हा विषय अवघड, कंटाळवाणा व नीरस आहे अशी गैरसमजूत आहे. मुलांना व्याकरणाची गोडी लागावी, त्यांनी व्याकरणाच्या पुस्तकाकडे आकर्षित व्हावे व अभ्यासाला सुरूवात करावी म्हणून हा यथाशक्ती प्रयत्न आहे.

लेखिका

## अनुक्रमणिका

### विभाग १ - व्याकरण

१. शब्दांच्या जाती ३
२. नाम ४
३. सर्वनाम ९
४. विशेषण ११
५. क्रियापद १३
६. अव्यय आणि त्यांचे प्रकार
१) क्रियाविशेषण अव्यय १५
२) शब्दयोगी अव्यय १८
३) उभयान्वयी अव्यय २१
४) केवलप्रयोगी अव्यय २४
७. वाक्याचे प्रकार २७
८. विरामचिन्हे ३०
९. लिंग ३३
१०. वचन ३५

### विभाग २ - भाषाभ्यास

१. समानार्थी शब्द ३६
२. विरुद्धार्थी शब्द ३७
३. वाक्प्रचार व त्यांचे अर्थ ३८
४. म्हणी ३९
५. जोडशब्द ४२
६. उपसर्ग ४३

### विभाग ३ - लेखन विभाग

१. निबंध लेखन ४४
२. पत्रलेखन ५१
३. बातमी लेखन ५९
४. संवाद लेखन ६२
५. सारांश लेखन ६५
६. जाहिरात ६८
७. सूचना फलक ७१
• अभ्यास - उत्तरे ७३

© **SHETH Publishing House** All rights are reserved. No part of this publication may be copied, adopted, reproduced, stored in or introduced into a retrieval system transmitted in any form by any means without prior written permission of the publisher.

© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF



# १ शब्दांच्या जाती

❖ वाक्यात जे शब्द येतात त्यांची कार्ये अनेक असतात. त्यांच्या वेगवेगळ्या कार्यावरून त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. शब्दांच्या **आठ** जाती आहेत.

**शब्द**

| **विकारी (अव्यय)** | **अविकारी (अव्यय)** |
|---|---|
| १) नाम | १) क्रियाविशेषण अव्यय |
| २) सर्वनाम | २) शब्दयोगी अव्यय |
| ३) विशेषण | ३) केवलप्रयोगी अव्यय |
| ४) क्रियापद | ४) उभयान्वयी अव्यय |

**नाम, सर्वनाम, विशेषण** व **क्रियापद** यांना **'अव्यये'** किंवा **'विकारी शब्द'** म्हणतात; कारण वाक्यात उपयोग करताना या शब्दांच्या रूपात बदल होतो.

**क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी, केवलप्रयोगी** ही **'अव्यये'** किंवा **'अविकारी शब्द'** आहेत; कारण वाक्यात उपयोग करताना त्यांच्या रूपात बदल होत नाही.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# २ नाम

❖ प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा कल्पनेला जाणवणाऱ्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना जी नावे दिलेली असतात त्यांना **नाम** म्हणतात. व्यक्ती, वस्तू, गुण यांच्या नावांना **नाम** म्हणतात.

❖ **नामाचे मुख्य तीन प्रकार आहेत.**

१. **सामान्यनाम** - एकाच जातीच्या पदार्थांतील समान गुणधर्मांमुळे त्या वस्तूला जे सर्वसामान्य नाव दिले जाते त्याला **सामान्यनाम** असे म्हणतात. **उदा.** नदी, मुलगा, फळ, शहर, पर्वत, इत्यादी.

२. **विशेषनाम** - ज्या नामाने एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो त्यास **विशेषनाम** असे म्हणतात. **उदा.** गंगा, अजय, भारत, गुलाब, इत्यादी.

३. **भाववाचक नाम** - जी नामे आपण पाहू शकत नाही परंतु त्यांची स्थिती, गुणधर्म, भावना यांची माहिती मिळते त्या नामांना **भाववाचक** नाम असे म्हणतात.
**उदा.** श्रीमंती, आंबटपणा, सुख, इत्यादी.

सामान्यनामे, विशेषनामे यांना **त्व, य, पणा, की, पण, ई, ता, गिरी, आई, वा** यासारखे प्रत्यय लागून भाववाचक नामे तयार होतात.

**वरील प्रत्यय लावून भाववाचक नामे कशी तयार करतात ते खालील तक्त्यात पाहा.**

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम |
|---|---|---|
| सुंदर | य | सौंदर्य |
| मातृ | त्व | मातृत्व |
| शहाणा | पणा, पण | शहाणपण/शहाणपणा |
| पाटील | की | पाटीलकी |
| गरीब | ई | गरिबी |
| नम्र | ता | नम्रता |
| सावध | गिरी | सावधगिरी |
| गोड | वा | गोडवा |
| महाग | आई | महागाई |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

❖ **धातुसाधित नामे** - धातूपासून तयार होणाऱ्या नामांना **धातूसाधित नामे** असे म्हणतात.

उदा. : १) देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे.

२) विदूषकाला पाहून मला हसू आले.

३) चालणे हा उत्तम व्यायाम आहे.

वरील वाक्यातील देणाऱ्याने, घेणाऱ्याने, हसू, चालणे हे शब्द; दे, घे, हस, चाल या धातूंपासून तयार झालेले आहेत. त्यांना **धातुसाधित नामे** असे म्हणतात.

धातूला **णे, ऊ, अ, ण,** हे प्रत्यय लागून नामे तयार होतात.

**जसे** - हसणे, रडू, धाव, दळण, वागणे.

❖ **लक्षात ठेवा :**

१) सामान्यनाम व विशेषनाम यांनी प्रत्यक्ष किंवा काल्पनिक प्राणी किंवा वस्तू यांचा बोध होतो, परंतु भाववाचक नामांमध्ये प्राणी किंवा वस्तू यांचा बोध होत नसून त्यांच्यातील गुणांचा बोध होतो.

२) सामान्य नामाचे अनेकवचन होऊ शकते. विशेषनाम व भाववाचक नामे ही एकवचनी असतात.

३) विशेषनाम हे व्यक्तिवाचक असते. तर सामान्यनाम हे जातिवाचक असते. (त्या जातीतील सर्व वस्तूंना लागू पडते.)

४) सामान्यनाम व भाववाचक नाम हे केव्हा केव्हा विशेषनामाचे कार्य करते, तर विशेषनाम हे सामान्यनामाचे कार्य करते.

© SHETH Publishing House

## स्वाध्याय

**प्र. १ खालील वाक्यातील नामे ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

१) शाळेला सुट्टी असली की मला खूप आनंद होतो. ____________

२) आमच्या संघाची खूप वाहवा झाली. ____________

३) जया अंगी मोठेपणा तया यातना कठीण. ____________

४) सागर आठवीत शिकतो. ____________

५) ताजमहालाचे सौंदर्य मी कॅमेऱ्यात टिपले. ____________



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**प्र. २ पुढील शब्दांना प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार करा व ती वाक्यात वापरा.**

१) शांत - ____

२) श्रीमंत - ____

३) नवल - ____

४) मधुर - ____

५) मित्र - ____

६) प्रामाणिक - ____

७) सावध - ____

८) माणूस - ____

९) गोड - ____

**प्र. ३ पुढील धातूंना प्रत्यय लावून धातुसाधित नामे तयार करा व ती वाक्यात वापरा.**

© SHETH Publishing House

१) वाच - ____

२) रड - ____

३) धाव - ____

४) उगव - ____

५) गा - ____

**प्र. ४ खालील तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम |
|---|---|---|
| १) गंभीर | य | ____ |
| २) ____ | य | तारुण्य |
| ३) धीर | य | ____ |



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

| | | |
|---|---|---|
| ४) मनुष्य | त्व | ________ |
| ५) ________ | त्व | मित्रत्व |
| ६) प्रौढ | त्व | ________ |
| ७) शत्रु | त्व | ________ |
| ८) मोठा | पण, पणा | ________ |
| ९) ________ | पण, पणा | देवपण |
| १०) बाल | पण, पणा | ________ |
| ११) प्रामाणिक | पण, पणा | ________ |
| १२) वकील | ई | ________ |
| १३) लबाड | ई | ________ |
| १४) सुदैव | ई | ________ |
| १५) उद्योग | ई | ________ |
| १६) ________ | ई | गरीबी |
| १७) गोड | ई | ________ |
| १८) सम | ता | ________ |
| १९) भव्य | ता | ________ |
| २०) ________ | ता | धार्मिकता |
| २१) ________ | ता | क्रूरता |
| २२) नम्र | ता | ________ |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

| | | |
|---|---|---|
| २३) गाव | की | |
| २४) | की | भिक्षुकी |
| २५) माणूस | की | |
| २६) पाटील | की | |
| २७) लुच्चा | गिरी | |
| २८) | गिरी | फसवेगिरी |
| २९) काम | गिरी | |
| ३०) | गिरी | गुलामगिरी |
| ३१) गार | वा | |
| ३२) दूर | वा | |
| ३३) | वा | ओलावा |
| ३४) गोड | वा | |
| ३५) नवल | आई | |
| ३६) दांडगा | आई | |
| ३७) चपळ | आई | |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ३ सर्वनाम

१) रामचा आवाज ऐका. तो गात आहे.

२) गणपत आणि गोविंद इथे आहेत. ते त्याचं गाणं ऐकण्यासाठी आले आहेत.

३) त्यांना पाहून त्याला आनंद होईल.

❖ वर पहिल्या वाक्यातील 'तो' हा शब्द राम या नामाबद्दल वापरला आहे.

❖ दुसऱ्या वाक्यात 'ते' हा शब्द गणपत व गोविंद या नामांबद्दल वापरला आहे. तसेच 'त्याचं' हा शब्द राम या नामाबद्दल वापरला आहे.

❖ तिसऱ्या वाक्यात 'त्यांना' हा शब्द गणपत व गोपाळ या नामांबद्दल वापरला आहे. 'त्याला' हा शब्द राम या नामाबद्दल वापरला आहे.

अशा रीतीने नामांबद्दल जे शब्द वापरले जातात त्यांना **सर्वनामे** असे म्हणतात.

**मी, आम्ही, आपण, तू, तुम्ही, तो, ती, ते, त्या, काय, कोण** ही सर्वनामे आहेत.

❖ **सर्वनामाचे एकूण सहा प्रकार आहेत:**

१) **पुरुषवाचक सर्वनाम** : याचे तीन प्रकार पडतात.

i) **प्रथम पुरुषवाचक** - बोलणारा स्वत:चा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती.

**उदा.:** मी, आम्ही, आपण, स्वत:, मला, आम्हाला.

ii) **द्वितीय पुरुषवाचक** - ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतात ती.

**उदा.:** तू, तुम्ही, तुम्हाला, आपण

iii) **तृतीय पुरुषवाचक** - ज्यांच्याविषशी बोलायचे त्या व्यक्ती व वस्तू यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती.

**उदा.:** तो, ती, ते, त्या, ह्या, त्या, ह्याला, त्यांना, हा, ही, हे.

२) **दर्शक सर्वनाम:** **जवळची** किंवा **दूरची** वस्तू दाखवण्यासाठी जे सर्वनाम वापरतो ती '**दर्शक सर्वनामे**'.

**उदा.:** १) तो माझा मित्र आहे.

२) त्या झाडावर खुप फुले आहेत.

३) ही माझी बेडरुम आहे.

हा, ही, हे, तो, ती, त्या, ते ही दर्शक सर्वनामाची उदाहरणे आहेत.

३) **संबंधी सर्वनामे:** वाक्यात पुढे येणाऱ्या **दर्शक सर्वनामाशी संबंध** दाखविणाऱ्या सर्वनामांना '**संबंधी सर्वनामे**' असे म्हणतात. **उदा.:** जो - जी, जे - ज्या.

**उदा.:** १) जे चकाकते ते सोने नव्हे. २) ज्याला जे हवे आहे, त्याला ते मिळेल.



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**४) प्रश्नार्थक सर्वनामे:** ज्या सर्वनामांचा उपयोग वाक्यात **प्रश्न** विचारण्यासाठी होतो त्यांना **'प्रश्नार्थक सर्वनामे'** म्हणतात. **उदा.:** कोण, कोणास, काय, केव्हा, इत्यादी.

**५) सामान्य किंवा अनिश्चित सर्वनामे:** **कोण, काय, कोणी** ही सर्वनामे वाक्यात **प्रश्न विचारण्यासाठी न येता** ती कोणत्या नामांबद्दल आली आहेत **हे निश्चितपणे सांगता येत नाही.** तेव्हा त्यांना **'सामान्य किंवा अनिश्चित सर्वनामे'** असे म्हणतात.

**उदा.** १) आज माझ्या डब्यात **काय** आहे ते मला माहित नाही.

२) **कोणी** यावे, **कोणी** जावे.

३) भांडणाने **कोणताच** प्रश्न सुटणार नाही.

**६) आत्मवाचक सर्वनामे:** **आपण** या सर्वनामाचा अर्थ जेव्हा **स्वत:, तुम्ही, आम्ही** असा होतो तेव्हा ती **'आत्मवाचक सर्वनाम'** असतात.

**उदा.:** १) त्याने **आपणहुन** मला मदत केली.

२) मी **स्वत:** कोणाची खोडी काढत नाही.

३) **आपण** बरे आपले काम बरे हा माझा स्वभाव आहे.

## स्वाध्याय

© SHETH Publishing House

**प्र. १ खालील वाक्यातील सर्वनाम व त्यांचे प्रकार ओळखून लिहा.**

१) तो आपणहून आंबे घेऊन आला. ______

२) उद्या मला सुट्टी आहे. ______

३) हे बघ किती सुंदर चित्र आहे! ______

४) सहलीला आपण कुठे जायचे? ______

५) जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण. ______

६) कोणी कोणास हसू नये. ______

७) त्या नदीपलीकडे माझे घर आहे. ______

८) त्या जमिनीत काय दडलंय माहित नाही. ______

९) जो सर्वप्रथम उत्तर देईल तो बक्षिसास पात्र ठरेल. ______

१०) तू स्वत: मोटार चालव. ______



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ४ विशेषण

१) अमर उंच आहे.

२) आळशी मुले नापास होतात.

३) गोविंद गरीब आणि इमानी आहे.

४) मुंबई श्रीमंत शहर आहे.

वरील वाक्यात अमर, मुले, गोविंद, मुंबई शहर ही नामे आहेत.

१) वरील पहिल्या वाक्यातील **'उंच'** हा शब्द अमर कसा आहे ते सांगतो.

२) दुसऱ्या वाक्यातील **'आळशी'** हा शब्द कशी मुले नापास होतात ते सांगतो.

३) तिसऱ्या वाक्यातील **'गरीब'** व **'इमानी'** हे शब्द गोविंद कसा आहे ते सांगतात.

४) चौथ्या वाक्यातील **'श्रीमंत'** हा शब्द शहराबद्दल अधिक माहिती देतो.

❖ अशा प्रकारे **नामाबद्दल अधिक माहिती** देणाऱ्या शब्दाला विशेषण असे म्हणतात.

❖ **विशेषणांचे मुख्य तीन प्रकार आहेत -**

१) **गुण विशेषण** - जे विशेषण नामाचा कोणताही गुण किंवा विशेष दाखवते त्याला 'गुण विशेषण' असे म्हणतात. **उदा :** कडू कारले, ढोंगी साधू, गोड आवाज.

२) **संख्या विशेषण** - जे विशेषण नामाची संख्या दाखविते त्याला 'संख्या विशेषण' असे म्हणतात. **उदा** : अर्धा डझन, आठवी इयत्ता, दसपट किंमत, एकेक लाडू, काही माणसे.

३) **सार्वनामिक विशेषण** - जेव्हा सर्वनामाचा उपयोग विशेषणाप्रमाणे होतो, तेव्हा त्या सर्वनामांना 'सार्वनामिक विशेषण' असे म्हणतात. **उदा :** माझे पेन, ते गाव, आमची बाग.

## स्वाध्याय

**प्र. १ खालील वाक्यातील विशेषणे ओळखा व त्याचे प्रकार लिहा.**

१) ते कपाट नवीन आहे. ______________

२) मला लाल गुलाब आवडतो. ______________

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

३) तिच्याकडे दहा पुस्तके होती.

४) द्राक्षे आंबट होती.

५) मी पकडलेला हा तिसरा झेल आहे.

६) हिरवीगार झाडे मनाला मोह घालतात.

७) देवळाजवळ काही भिकारी भीक मागत होते.

८) चालत्या बसमधून डोकावू नये.

९) नऊ वर्षाची सुमा गोड गाणी गाते.

१०) माझ्या घरासमोर केशकर्तनालय आहे.

११) पुढच्या गल्लीत आम्ही राहतो.

१२) आईला बनारसी साडी आवडते.

१३) कोल्हापूरी गूळ सर्वात प्रसिद्ध आहे.

१४) संजयला फळ-भाजी फार आवडते.

१५) सर्व रस्ते पाण्याने तुडुंब भरले होते.

१६) घराच्या मागील बाजूस एक विहीर आहे.

१७) रमाकडे बोलकी बाहुली आहे.

१८) हा मनुष्य पाहा.

१९) अजयला सहा भाषा अवगत आहेत.

२०) मी घराला दुहेरी रंगाचे पडदे लावले.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ५ क्रियापद

❖ वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला 'क्रियापद' म्हणतात.

**उदा.** १) मारियाने कुलूप **उघडले.** २) तेवढ्यात तिथे अंजू **येते.**

❖ वरील वाक्यात '**उघडले**' '**येते**' हे शब्द त्या त्या क्रिया दाखवतात. हे शब्द त्या त्या वाक्यांचे अर्थ पूर्ण करतात. अशा शब्दांना 'क्रियापद' म्हणतात.

❖ संयुक्त क्रियापद - वाक्यात कधी-कधी क्रियेचा अर्थ पूर्ण करण्यासाठी मुख्य क्रिया दर्शवणाऱ्या रुपाला जोडून दुसऱ्या क्रियापदाचा उपयोग करावा लागतो. अशाप्रकारे त्या दोघांच्या संयोगाने जे क्रियापद तयार होते त्याला 'संयुक्त क्रियापद' असे म्हणतात.

**उदा.:** १) विजांचा कडकडाट **सुरू झाला.** २) दिनेश एका जागेवर **बसला आहे.**

वरील वाक्यात '**सुरू झाला**' व '**बसला आहे**' ही 'संयुक्त क्रियापदे' आहेत.

'झाला', 'आहे' ही 'सहाय्यक क्रियापदे' आहेत.

## स्वाध्याय

**प्र. १ पुढील वाक्यात क्रियापदे घालून ती वाक्ये पूर्ण करा.**

१) ईश्वर हा दयाळू ______________ .

२) ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ______________ .

३) वासरू गाईकडे धावत ______________ .

४) गुरुजी म्हणाले की अक्षर सुंदर ______________ .

५) ऋषींनी वेद ______________ .

६) नदी समुद्रास ______________ .

७) माझ्याजवळ पैसे मुळीच ______________ .

८) टिपूर चांदणे ______________ .

९) तान्हे मूल पाळण्यात ______________ .

१०) मुले गाणी ______________ .

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

११) शिक्षक कविता ______ .

१२) रस्त्यावर मोटारी, बस, सायकली ______ .

१३) सर्वजण चरख्यावर सूत ______ .

१४) चमेलीचा मांडव फुलांनी ______ .

१५) माळ्याने झाडा-वेलींना पाणी ______ .

## प्र.२ खालील वाक्यातील क्रियापद ओळखून लिहा.

१) निलेश नदीवर पोहोचला. ______

२) घरातील सारे हसू लागले. ______

३) तो योग आला नाही. ______

४) धनाशेट आश्चर्याने ओरडले. ______

५) माझ्याकडे एवढे पैसे नाहीत. ______

६) रामोजी हे ऐकून हबकला. ______

७) गावकऱ्याने पैज मान्य केली. ______

८) वाचनाची मला गोडी लागली. ______

९) लालजी यावर विचारात पडला. ______

१०) पक्षी स्वच्छंद विहार करीत आहेत. ______

११) आलोकने सुटकेचा नि:श्वास टाकला. ______

१२) चिन्नम्माने पैसे घ्यायला नकार दिला. ______

१३) कृतज्ञतेने त्यांनी हमालाला मिठी मारली. ______

१४) दिनूच्या शाळेचा पहिलाच दिवस होता. ______

१५) विक्रमला पुस्तके फार आवडायची. ______

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ६ अव्यय आणि त्यांचे प्रकार

❖ नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद हे चारही शब्द वाक्यात वापरले असता त्यात बदल म्हणजे विकार होतात, म्हणून त्यांना 'विकारी शब्द' म्हणतात.

❖ क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी, अव्यय, उभयान्वयी अव्यय व केवलप्रयोगी अव्यय हे चारही शब्द वाक्यात वापरले असता त्यात बदल म्हणजे विकार होत नाहीत. म्हणून त्यांना 'अविकारी शब्द' म्हणतात.

## १. क्रियाविशेषण अव्यय

❖ क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगून जे शब्द अविकारी राहतात त्यांनाच 'क्रियाविशेषण अव्यये' असे म्हणतात.

❖ खाली काही क्रियाविशेषण अव्यये दिली आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आज | नेहमी | येथे | दूर | काल | सदा |
| तेथे | बाहेर | उद्या | पुन्हा | आत | सभोवार |
| आता | वारंवार | चटकन | नंतर | दररोज | जिकडे |
| झटकन | मागे | पुढे | अलीकडे | टपटप | पूर्वी |
| खाली | पलीकडे | हळूहळू | पुष्कळ | अतिशय | खूप |
| जलद | सावकाश | खळखळ | धोधो | | |

| क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार | | | |
|---|---|---|---|
| १) रीतीवाचक क्रियाविशेषण | २) स्थानवाचक क्रियाविशेषण | ३) कालवाचक क्रियाविशेषण | ४) परिणामवाचक /संख्यावाचक |
| चटकन, सतत, गुपचुप, अलगद, सावकाश, झपाट्याने, त्वरेने, जोमाने. | बाहेर, आत, समोर, मागे, आजुबाजूचा, जिकडे-तिकडे. | आज, आता, अजून, सकाळी, आत्ता, उद्या. | थोडे, फार, रोज, दोनदा. |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## स्वाध्याय

**प्र. १ खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यये ओळखा:**

१) पक्षी मंजूळ गात होते.
२) वारा झुळझूळ वहात होता.
३) एकाएकी गुंड गाडीत शिरले.
४) जिकडे तिकडे घनदाट झाडी आहे.
५) रिक्षा अद्याप आलेली नव्हती.
६) सगळीकडे धांदल उडाली होती.
७) ते आनंदाने खेळले.
८) गुलमोहर प्रसन्नपणे डोलत आहे.
९) आम्ही सावकाश बोरे खाल्ली.
१०) संध्याकाळी सर्वांनी सभेला या.
११) इतक्यात गुरुजी वर्गात आले.
१२) सकाळीच पाहुणे घरी आले होते.
१३) मुले भरभर चालू लागली.
१४) मुली सावकाश फुले वेचित होत्या.
१५) आज दसरा उजाडला.
१६) ती लगबगीने त्याच्या घरी पोहोचली.
१७) अखेर तो महत्त्वाचा दिवस उजाडला.
१८) अजून सगळ्या मुली आल्या नाहीत.
१९) पाण्याचा ओहळ खळखळ वाहत होता.
२०) ती सर्वजण जोमाने कामाला लागली.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**प्र.२ रिकाम्या जागी कंसात दिलेली योग्य ती क्रियाविशेषणे घालून वाक्ये लिहा.**

**(मटकन, उद्या, पुढे, जोराने, उशीरा, पटापट, आज)**

१) आई ______ येणार आहे.

२) आळशी मुलगा शाळेत ______ आला.

३) ______ सकाळी आपण पुण्याला जाऊ.

४) गुरुजींनी त्याला ______ बोलावले.

५) ती बातमी ऐकताच तो ______ खाली बसला.

६) मोटार ______ धावत होती.

७) उंच मुलगा ______ धावत होता.

**प्र.३ खालील वाक्यात योग्य ती क्रियाविशेषण अव्यये लिहा.**

१) ______ उद्यान आहे.

२) रामने मुलाला ______ उचलले.

३) ______ पसाराच पसारा पडलेला होता.

४) काल ______ पाऊस पडला.

५) ती ______ कामाला जाते.

६) मुलींनी ______ घरी जावे.

७) ______ आकाश काळ्या ढगांनी भरुन आले.

८) ______ लांब आहे त्याचे घर!

९) आंधळा गोसावी ______ चालू लागला.

१०) मुलांनो ______ कामे करा.



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# २. शब्दयोगी अव्यय

जे अव्यय शब्दाला जोडून येते, त्यास **'शब्दयोगी अव्यय'** असे म्हणतात.

❖ **खालील वाक्ये नीट वाचा.**

१) घरा**पासून** शाळा दूर आहे.

२) माझ्या**जवळ** पाच रुपये आहेत.

३) आई**करिता** बाबांनी साडी आणली.

**पासून, जवळ, करिता** हे शब्द **नामांना** व **सर्वनामांना** जोडून आले आहेत.

पहिल्या वाक्यात **'घर'** या नामाचा संबंध **'दूर आहे'** या शब्दांशी दाखविण्यासाठी **'पासून'** शब्द आला आहे.

दुसऱ्या वाक्यात **'माझ्या'** या सर्वनामाचा संबंध **'रुपये आहेत'** या शब्दांशी दाखविण्यासाठी **'जवळ'** शब्द आला आहे.

तिसऱ्या वाक्यात **'आई'** या नामाचा संबंध **'साडी आणली'** या शब्दांशी दाखविण्यासाठी **'करिता'** शब्द आला आहे.

❖ अशाप्रकारे नाम अगर सर्वनाम यांना जोडून येणाऱ्या त्याच वाक्यातील दुसऱ्या शब्दाशी त्या शब्दाचा संबंध दाखविणाऱ्या शब्दाला **'शब्दयोगी अव्यय'** असे म्हणतात.

लिहिताना हे शब्द मागील शब्दांना जोडून लिहावेत. वाक्यात शब्दयोगी अव्यये नसतील तर त्या वाक्याचा अर्थ नीट समजणार नाही.

शब्दयोगी अव्यय शब्दाला जोडताना मागील शब्दाचे बहुदा सामान्यरुप होते.

**उदा.:** घर - **घरा**, माझा - **माझ्या**.

❖ **खालील वाक्ये नीट वाचा.**

१) त्याचे वडील आज**च** आले.

२) तू **मात्र** बोलू नको.

३) आई**देखील** माझ्यावर रागावली.

४) गाई**बरोबर** वासरु**ही** आहे.

❖ वरील वाक्यात **'च'**, **'मात्र'**, **'देखील'**, **'ही'** ही शब्दयोगी अव्यये आली आहेत. ती जोडल्यामुळे मागील शब्दांची **सामान्यरुपे** झाली **नाहीत**. अशा शब्दयोगी अव्ययांना **'शुद्ध शब्दयोगी अव्यये'** म्हणतात. **'च'**, **'मात्र'**, **'देखील'**, **'ही'**, **'ना'**, **'सुद्धा'**, **'पण'**, **'ही'** शब्दयोगी अव्यये अशी आहेत.



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## स्वाध्याय

**प्र.१ खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यये ओळखून लिहा.**

१) मोराच्या डोक्यावर तुरा असतो. ______

२) मुलांसाठी तिने खूप त्याग केला. ______

३) मुले घराकडे निघाली. ______

४) समुद्रामध्ये खूप मासे असतात. ______

५) आमच्या घराभोवती बाग आहे. ______

६) दिव्यासाठी वात आणली पाहिजे. ______

७) कृष्ण दाराआड लपला होता. ______

८) वेशीपर्यंत सर्वजण पायी पायी आले. ______

९) सर्व बायका नदीवर गेल्या. ______

१०) त्याच्याकडे लोक पाहू लागले. ______

११) गावामध्ये मोठा पुतळा आहे. ______

१२) आईदेखील माझ्यावर रागवली. ______

१३) सूर्य डोंगरामागे गेला. ______

१४) तुला आज आलेच पाहिजे. ______

१५) गाईबरोबर वासरूही आले. ______

१६) झाडाआडून ते गोळीबार करत होते. ______

१७) हत्तीवरून राजाची मिरवणूक निघाली. ______

१८) सर्वजण त्याच्याकडे बघतच राहिले. ______

१९) शिलेदार राजासमोर जाऊन उभे राहिले. ______

२०) लोक खुळ्यासारखे गाडीकडे बघत होते. ______

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

प्र.२ खालील वाक्यात रिकाम्या जागी शब्दयोगी अव्यये घालून ती पुन्हा लिहा:

१) झाडा ____________ पक्षी गात होते.

२) त्याचे मन अभ्यास ____________ रंगून गेले होते.

३) भारतातील पहिली आगगाडी मुंबई ____________ ठाण्या ____________ धावली.

४) दगडा ____________ विंचू असेल.

५) भगवा पोशाख घातलेली विवेकानंदांची मूर्ती अमेरिकन श्रोत्यां ____________ उभी राहिली.

६) देवाच्या मूर्ती ____________ ती ध्यानस्थ बसत असे.

७) नरेन्द्र आई ____________ नाटक पहावयास गेला होता.

८) आई ____________ बाबांनी साडी आणली.

९) मुलां ____________ तिने खूप कष्ट सोसले.

१०) तुझ्या ____________ किती पैसे आहेत?

११) राजाच्या लहरी ____________ राजव्यवस्था चालत असे.

१२) आज सकाळ ____________ पाऊस पडत होता.

१३) आम्ही शाळेच्या फाटका ____________ आलो.

१४) पक्षी झाडा ____________ बसले होते.

१५) शिलेदार राजा ____________ जाऊन उभा राहिला.

१६) झाडा ____________ ते गोळीबार करत होते.

१७) तुझ्या ____________ नवीन पुस्तक आहे का?

१८) त्यांच्या ____________ संकटांचे डोंगर कोसळले.

१९) पुढे आयुष्य ____________ त्यांनी समाजसेवा केली.

२०) मी येईन तुझ्या ____________.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ३. उभयान्वयी अव्यय

❖ पुढील वाक्ये वाचा.

१) रामा <u>**व**</u> गोविंदा निघाले.

२) आम्ही शाळेत गेलो <u>**आणि**</u> घंटा झाली.

३) तू रोज सकाळी <u>**किंवा**</u> संध्याकाळी येत जा.

पहिल्या वाक्यात '**व**' हा शब्द रामा आणि गोविंदा या शब्दांना जोडतो.

दुसऱ्या वाक्यात '**आणि**' हा शब्द आम्ही शाळेत गेलो व घंटा झाली या दोन वाक्यांना जोडण्याचे काम करतो.

तिसऱ्या वाक्यात '**किंवा**' हा शब्द सकाळी आणि संध्याकाळी या शब्दांना जोडतो.

❖ अशा प्रकारे **दोन शब्द** किंवा **दोन वाक्ये** जोडणारे जे **अविकारी शब्द** असतात त्यांना '**उभयान्वयी अव्यये**' असे म्हणतात. (उभय - दोन, अव्ययी - जोडणारे)

## स्वाध्याय

### प्र.१ खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यये ओळखून लिहा.

१) श्रीहरी किंवा श्रीपती येईल. ______________

२) तू सांगितलेस तर मी हे करीन. ______________

३) वारा आला व ढग पांगले. ______________

४) बाबांनी पुस्तके व खेळणी आणली. ______________

५) साधू अंगारा नि प्रसाद द्यायचे. ______________

६) विश्रांती घे आणि मग जा. ______________

७) सुशिक्षित पण गरीब होता तो. ______________

८) तू आलास तेव्हा मी बाहेर गेलो होतो. ______________

९) ढग गर्जत होते पण पाऊस मुळी पडला नाही. ______________



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

१०) मी वर्गात शिरलो आणि शाळेची पहिली घंटा झाली. ______

११) आई दारात उभी राहते नि म्हणते आत ये आधी. ______

१२) आपण जर पाण्यात पडलो तर आपला पत्तासुद्धा लागणार नाही. ______

१३) तो झाडावरुन पडला व बेशुद्धच झाला. ______

१४) आपण देवाच्या कृपेने वाचलो की आईच्या पुण्याईने हे माधवला कळेना. ______

१५) रोज इथे येत जा अन् जेवण करून जात जा. ______

१६) विनूला रडू आले कारण तो आंधळा होता. ______

१७) हसल्याने आयुष्य वाढते आणि रडल्याने ते कमी होते. ______

१८) मुलांनी धडाधड पाण्यात उड्या मारल्या परंतु मुली मात्र घाबरल्या. ______

१९) तिने खूप परिश्रम केले म्हणून ती श्रीमंत झाली. ______

२०) तो माझ्याकडे आला असता तर मी केली असती त्याला मदत. ______

२१) "वाचवा... वाचवा...", पण त्याचा आवाज ऐकायला दिनूच होता. ______

२२) डॉक्टर म्हणतात की तिला खूप महागडी औषध द्यावी लागतील. ______

२३) अंगातले त्राण संपले तरीही तो नदीच्या काठापर्यंत पोहत आला. ______

२४) बाजाराचा दिवस होता म्हणून गर्दी झाली होती. ______

२५) साहेब भेट किंवा बक्षिसासाठी नाही आलो. ______

**प्र.२ पुढील वाक्यात उभयान्वयी अव्यये घाला.**

१) राम, लक्ष्मण ______ सीता वनवासास गेले.

२) तू खूप अभ्यास कर ______ पास होशील.

३) प्रयत्न केला ______ यश येणारच.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

४) जपानमध्ये वारंवार भूकंप होतात ________ जपानी लोक बाबूंची घरे बांधतात.

५) जनक सम्राट होता ________ विरक्त होता.

६) उजाडले ________ सूर्य कोठे आहे?

७) एक शांत असले ________ दुसरेही शांत असते.

८) सूर्योदय झाला ________ लोक कामाला लागले.

९) विश्रांती घे ________ मग जा.

१०) आकाश ________ समुद्र जशी काही जुळी भावंडेच.

**प्र.३ खाली दिलेल्या उभयान्वयी अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१) म्हणून - ________

२) कारण - ________

३) की - ________

४) म्हणजे - ________

५) अथवा - ________

६) पण - ________

७) बाकी - ________

८) तर - ________

९) तेव्हा - ________

१०) आणखी - ________

११) नि - ________

१२) व - ________

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ४. केवलप्रयोगी अव्यय

❖ पुढील वाक्ये वाचा.

१) **अबब!** केवढी ही गर्दी!

२) **शाबास!** छान उत्तर दिलेस!

३) **शी!** मला नाही आवडत ते.

४) **बापरे!** धरण तर फुटलं.

वरील वाक्यांच्या सुरवातीला **अबब, शाबास, शी, बापरे** हे शब्द आले आहेत. आपण मनातील विचार शब्दातून किंवा वाक्यांतून व्यक्त करतो, पण काही वेळा हे विचार व्यक्त करण्यापूर्वी मनात भरून आलेल्या भावनांचा स्फोट होऊन एखादा **उद्गार** बाहेर पडतो. त्या शब्दांचा पुढे येणाऱ्या वाक्याशी संबंध **नसतो**. त्यांचा केवळ प्रयोग (उपयोग) करायचा म्हणून ते उच्चारले जातात, म्हणून अशा शब्दांना **'केवलप्रयोगी अव्यये'** असे म्हणतात.

आपल्या मनात जितक्या प्रकारच्या भावना उद्भवतात, तितके त्यांचे प्रकार होतील.

काही केवलप्रयोगी अव्यये - शाबास, अरेरे, वा! वा!, वाहवा!, अरेच्या, छे छे, छान, अरे, अगा, छत् , हुत् , फुस् , इश्श, यु, अंहं, ठीक, बराय, हा, ऊः, भले, अहाहा, आईग, अहा, अहो, वा, बापरे, गप् , हाय इ.

मुलांनो, एक गोष्ट लक्षात ठेवा की उद्गारवाचक शब्दापुढे नेहमी **उद्गारचिन्ह** असणे जरुर आहे.

**जसे -** १) **बस्स!** अधिक न बोलता त्यांनी निरोप घेतला.

२) **अबब!** केवढी प्रंचड इमारत ही!

## स्वाध्याय

**प्र.१ पुढील वाक्ये वाचा व त्यात कोणती केवलप्रयोगी अव्यये आहेत ते लिहा.**

१) शाबास! फार छान खेळलास तू. ____________

२) छे! ते माझ्याच्याने होणार नाही. ____________

३) अबब ! किती उंच इमारत आहे! ____________

४) हां ! सांभाळून बोल ! ____________

५) अँ! त्यात काय मोठे? ____________



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

६) हं ! जरा सावकाश खा. ______

७) आईग ! किती ह्या जखमा ! ______

८) छे ! मी नाही येणार तुझ्याबरोबर ! ______

९) हॅट! चालता हो येथून! ______

१०) छान! किती सुंदर हा गुलाब! ______

११) ओहो! काय थाट वर्णावा? ______

१२) अहाहा! काय थंडगार हवा आहे ! ______

१३) शाबास ! असेच यश मिळत राहो. ______

१४) गप ! एकदम आवाज बंद कर ! ______

१५) चुप! किती ही वटवट! ______

१६) ठिक ! मी येईन तुझ्याकडे. ______

१७) ओ ! तुम्ही का आला होता काल? ______

१८) बाप रे ! केवढा साप होता तिथे ! ______

१९) छे ! अगदी असह्य आहे आजचे ऊन. ______

२०) अरेरे ! त्याच्या पायावरून मोटार गेली. ______

© SHETH Publishing House

**प्र.२ पुढील वाक्यात योग्य ती केवलप्रयोगी अव्यये लिहा.**

१) ______ ! तूच का म्हणतोस हे!

२) ______ ! केवढी मोठी रांग आहे ही !

३) ______ ! काय सांगू त्या मेजवानीचा थाट !

४) ______ ! त्या भिकाऱ्याचे आता कसे होईल !

५) ______ ! फारच चांगला झेल घेतला त्याने.



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

६) ____________! एक शब्द बोलू नको.

७) ____________! इकडे कुठे तू ?

८) ____________! सोमवारी नक्की येईन तुमच्याकडे.

९) ____________! काय सुंदर देखावा आहे हा.

१०) ____________! असा प्रसंग वैऱ्यावर देखील येऊ नये.

**प्र.३ खालील वाक्यातील अव्यये ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

१) माधव घोड्यावरून पडला. ____________

२) त्याने बोटभर चिठ्ठीसुद्धा कधी पाठवली नाही. ____________

३) छे! छे! असे काहीही होणार नाही. ____________

४) तिने मान वर करून आकाशाकडे नजर लावली. ____________

५) पांढऱ्याशुभ्र फुलांनी झाडे बहरून आली होती. ____________

६) गंगेच्या पाण्याप्रमाणे तिचे मन स्वच्छ नि पवित्र होते. ____________

७) महादेवाच्या देवळापाशी खूपच गर्दी होती. ____________

८) अरे ! काय हे तुझे बोलणे ? ____________

९) खेळता खेळता तो झाडावरून पडला. ____________

१०) गाडगेबाबा थोर संत व समाजसेवक होते. ____________

११) पावसाचे पाणी रस्त्यावरच्या खड्ड्यात साचून राहिले होते. ____________

१२) लालभडक पण सुंदर फुलांनी ते झाड न्हाऊन निघालं होतं. ____________

१३) अंधार पडला की सारे गाव गपगार होऊन जातं. ____________

१४) ताजमहाल यमुनेच्या किनाऱ्यावर आहे. ____________

१५) चांदण्या रात्री नौकाविहार करण्यासाठी सर्वजण नदीकिनारी जमले. ____________

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ७ वाक्यांचे प्रकार

❖ आपण एखाद्या व्यक्तीशी बोलताना त्यात अनेक वाक्य येतात. बोलताना आपण कोणाबद्दल काहीतरी बोलत असतो. वाक्याचे दोन भाग पडतात १) उद्देश्य २) विधेय

ज्याच्याविषयी बोलतो त्यास 'उद्देश्य' असे म्हणतात व उद्देश्याविषयी जे काही बोलतो त्यास 'विधेय' म्हणतात.

**उदा.-** आज सचिन तेंडुलकर सामन्यात उत्कृष्ट खेळला.

वरील विधानात सचिन तेंडुलकर बद्दल सांगितले आहे म्हणून सचिन तेंडुलकर हे उद्देश्य झाले व खेळला हे विधेय झाले.

**वाक्यांचे त्यांचा अर्थाच्या अनुरोधाने खालीलप्रमाणे प्रकार पडतात:**

१) विधानार्थी वाक्य २) प्रश्नार्थी वाक्य ३) उद्गारार्थी वाक्य
४) होकारार्थी वाक्य ५) नकारार्थी वाक्य

❖ आणखी एका पद्धतीने वाक्यांचे विविध प्रकार मानले जातात-

१) स्वार्थी वाक्य २) आज्ञार्थी वाक्य
३) विध्यर्थी वाक्य ४) संकेतार्थी वाक्य

❖ याशिवाय एका वाक्यात किती विधाने असतात, त्यावरुन वाक्याचे आणखी तीन प्रकार मानले जातात.

१) केवल वाक्य २) मिश्रवाक्य ३) संयुक्तवाक्य

१) केवल वाक्य - ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते त्यास 'केवल' किंवा 'शुद्ध वाक्य' म्हणतात.

केवल वाक्य हे साधे, विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी वा नकारार्थी कोणत्याही प्रकारचे असू शकते.

**उदा.-** १) मी रोज गृहपाठ करतो.
२) मोर थुईथुई नाचतो.

वरील वाक्यात कोणते विधान केले आहे? 'करतो' व 'नाचतो' हे. हे विधान कोणाला उद्देशून केले? 'मी' व 'मोर' याबद्दल म्हणून 'मी' व 'मोर' हे उद्देश्य व 'करतो' आणि 'नाचतो' ही विधेय आहेत.



©SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

२) **मिश्रवाक्य** - एक प्रधानवाक्य व एक किंवा अधिक गौणवाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे एक संमिश्र वाक्य तयार होते, त्यास **'मिश्र वाक्य'** असे म्हणतात.

**उदा.** -१) आई म्हणाली, की ऊन्हात खेळू नकोस.

२) पाऊस पडू लागला, की मातीचा सुगंध येतो व मन आनंदी होते.

वरील पहिल्या वाक्यात 'आई म्हणाली' हे मुख्य किंवा प्रधान वाक्य व 'ऊन्हात खेळू नकोस' हे गौण वाक्य 'की' या उभयान्वयी अव्ययाने जोडले आहे.

दुसऱ्या वाक्यात 'पाऊस पडू लागला' हे मुख्य वाक्य आहे. 'मातीचा सुगंध येतो, मन आनंदी होते' ही गौण वाक्य 'की' 'व' या उभयान्वयी अव्ययांनी मुख्य वाक्यास जोडली गेली आहेत.

## स्वाध्याय

**प्र.१ खालील वाक्यातील मुख्य वाक्य व गौण वाक्य ओळखून रकान्यात भरा.**

१) जेव्हा मला वाटेल तेव्हा मी चित्र काढेन.

२) जे चकाकते ते सोने नसते.

३) मी विचार केला, की गावाला जाईन व शेती करेन.

४) गुरुजी म्हणाले, की प्रत्येकाने स्पर्धेत भाग घ्यावा.

५) दिवाळी आली, की आम्ही आकाशकंदिल बनवणार.

| क्र. | मुख्य वाक्य | गौण वाक्य |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |
| ५) | | |

©SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**३) संयुक्त वाक्य -** संयुक्त वाक्यात दोन केवलवाक्ये, दोन मिश्र वाक्ये किंवा केवल-मिश्रवाक्ये असतात. ती दोन वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात; पण ती स्वतंत्र असतात. अर्थाच्या दृष्टीने ती एकमेकांवर अवलंबून नसतात अशा जोडवाक्यांना **'संयुक्त वाक्ये'** असे म्हणतात.

**उदा.-** १) विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.
२) मला यायला उशीर झाला कारण आज बसचा संप होता.

## स्वाध्याय

**प्र.१ खाली दिलेल्या वाक्यात संयुक्त वाक्ये लिहून विधाने पूर्ण करा.**

१) दहावीनंतर मी आर्टस् घेईन किंवा ______________________.

२) आमच्या शाळेत मुले आहेत आणि ______________________.

३) आजी सकाळी फिरायला जाते आणि संध्याकाळी ______________________.

४) विनयने खूप कष्ट घेतले म्हणून ______________________.

५) लोक आपली स्तुती करोत अथवा ______________________.

६) सारेजण माझ्यावर रागावले पण ______________________.

७) तुला तिने सर्वांना अभिवादन केले आणि ______________________.

८) निहारची परीक्षा होती म्हणून ______________________.

९) आपण गर्व करु नये कारण ______________________.

११) मी रोज सकाळी पहाटे उठतो व ______________________.

१२) सांयकाळी मी क्रीडांगणावर खेळतो किंवा ______________________.

१३) विजा चमकू लागल्या आणि ______________________.

१४) वाटेत गाडी बंद पडली म्हणून ______________________.

१५) गुरुजी म्हणाले की ______________________.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ८ विरामचिन्हे

❖ मनुष्य जेव्हा बोलत असतो तेव्हा त्याला मधून मधून थांबावेच लागते. या थांबण्याला **'विराम'** असे म्हणतात.

❖ जेव्हा आपला विचार लिहून दाखविला जातो तेव्हा वेळोवेळी घ्यावा लागणारा विराम निरनिराळ्या चिन्हांनी दाखवावा लागतो. त्यांनाच **'विरामचिन्हे'** असे म्हणतो.

विराम चिन्हे आपल्या लेखनात नसली तर वाक्य कोठे संपले, कोठे सुरु झाले, ते कसे उच्चारायचे हेच मुळी समजणार नाही.

विरामचिन्हे कोठे व केव्हा वापरायची याबाबतचे नियम पुढील तक्त्यात सोदाहरण दिले आहेत. त्यांचा नीट अभ्यास करा व लिहिताना योग्य स्थळी त्यांचा वापर करा.

| क्र. | चिन्ह | चिन्हाचे नाव | केव्हा वापरतात | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| १. | . | **पूर्णविराम** | १) विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी.<br>२) शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी आद्याक्षरपुढे. | १) मी शाळेत जातो.<br>२) ता.क. (ताजा कलम), स.न.वि.वि. सप्रेम नमस्कार विनंती विशेष) |
| २. | ; | **अर्धविराम** | दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असता. | थोडे कर्ज घ्यावे; म्हणून मोहन पेढीवर गेला. |
| ३. | , | **स्वल्पविराम** | १) एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास.<br>२) संबोधन दर्शविताना | १) आईने मला कांदे, बटाटे, लिंबू, मिरची, नारळ व भाजी आणण्यास सांगितले.<br>२) मीना, पुस्तक आण. |
| ४. | : | **अपूर्ण विराम** | वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास. | मराठी विषयाचे प्रत्येक परिक्षेचे गुण : १२,१४,८०,१५,११,७५. |
| ५. | ? | **प्रश्नचिन्ह** | प्रश्नार्थ वाक्याच्या शेवटी | तुला काय बक्षीस मिळाले ? |
| ६. | ! | **उद्गार चिन्ह** | निरनिराळ्या भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी. | १) अबब! केवढा हा प्रचंड प्राणी आहे.<br>२) वा! तुझं अक्षर खूप छान आहे. |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | '-'<br>"-" | **अवतरण चिन्ह** | (दुहेरी " ") बोलणाऱ्याच्या तोंडाचे शब्द दाखविण्याकरिता<br>(एकेरी ' ') एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असता. | १) गुरुजी म्हणाले, " खूप अभ्यास कर."<br>२) दिवाळी या सणाला 'दिपावली' असे ही म्हणतात. |
| ८. | - | **संयोग चिन्ह** | १) दोन शब्द जोडताना.<br>२) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास. | १) दोन-तीन, विद्यार्थी-भांडार<br>२) मुले घरासमोरील पटांगणा -वर खेळत होती. |
| ९. | - | **अपसारण चिन्ह (डॅश) (स्पष्टीकरण चिन्ह)** | १) बोलता बोलता विचार-मालिका तुटल्यास<br>२) स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास | १) मी पास तर झालो, पण-<br>२) ससा आणि कासव - शर्यत - ससा पुढे पळतो- कासवांची मंदगती - ससा विश्रांती घेतो - कासव शर्यत जिंकतो. |

## स्वाध्याय

**प्र.१ पुढील वाक्यात योग्य विरामचिन्हाचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा.**

१) हिमालय आरवली विंध्य हे भारतातील पर्वत आहेत

**उत्तर** ____________________

२) ढग खुप गर्जत होते पण पाऊस पडला नाही

**उत्तर** ____________________

३) तिळगुळ घ्या गोड गोड बोला असे म्हणून तोंड गोड

**उत्तर** ____________________

४) आईने दिवाळीत लाडू चकल्या शेव अनारसे चिवडा हे सर्व पदार्थ केले

**उत्तर** ____________________



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

५) वा छान नाव आहे तुझं

उत्तर

६) शास्त्रीजींनी जय जवान हा मंत्र दिला

उत्तर

७) तुझी आई आजारी आहे आहे खर ना गुरुजींनी प्रेमळपणे विचारले

उत्तर

८) शैलेंद्र ओरडला सुवर्णा बाहेर ये

उत्तर

९) गणेश आईला म्हणाला मी कधीही चुकीचे वागणार नाही

उत्तर

१०) भारत माता की जय आपले सैनिक रणगर्जना करीत होते

उत्तर

११) तिने विचारले काय झाले चिन्नमा

उत्तर

१२) आणि नाही मिळाली तर रामोजीने हसून विचारले

उत्तर

१३) आई एवढ्याशा पैशानं तिचं कसं भागेल

उत्तर



©SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ९ लिंग

❖ शरीराच्या भागावरून तयार झालेल्या म्हणी.ज्या नामावरून पुरूषजातीचा बोध होतो, त्यास 'पुल्लिंग' म्हणतात.

उदा. **तो** वाघ, **तो** घोडा, **तो** डोंगर

❖ ज्या नामावरून स्त्रीजातीचा बोध होतो, त्यास 'स्त्रीलिंग' म्हणतात.

उदा. **ती** मुलगी, **ती** आजी, **ती** होडी, **ती** बकरी

❖ ज्या नामावरून पुरूष किंवा स्त्री जातीचा बोध होत नाही, त्यास 'नपुंसकलिंग' म्हणतात.

उदा. **ते** जहाज, **ते** पुस्तक, **ते** पान, **ते** माकड

| पुल्लिग | स्त्रीलिंग | पुल्लिग | स्त्रीलिंग | पुल्लिग | स्त्रीलिंग | पुल्लिग | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घोडा | - घोडी | साहेब | - बाईसाहेब | महाराज | - महाराणी | काका | - काकी, काकू |
| मित्र | - मैत्रीण | कुत्रा | - कुत्री | माकड | - माकडीण | बोका | - मांजर |
| गुरुजी | - बाई | बैल | - गाय | बोकड | - शेळी | गाढव | - गाढवीण |
| कवी | - कवयित्री | पक्षी | - पक्षिण | डॉक्टर | - डॉक्टरीण | शेतकरी | - शेतकरीण |
| वडील, बाबा | - आई | शिक्षक | - शिक्षिका | बंधू | - भगिनी | भाऊ | - बहीण |
| लेखक | - लेखिका | गृहस्थ | - गृहिणी | विद्यार्थी | - विद्यार्थिनी | माणूस | - बाई |
| दादा | - ताई | खुळा | - खुळी | शहाणा | - शहाणी | मोर | - लांडोर |
| आजोबा | - आजी | पुरुष | - स्त्री | पुत्र | - कन्या | सासरे | - सासू |
| मामा | - मामी | हरिण | - हरिणी | चिमणा | - चिमणी | मुख्याध्यापक | - मुख्याध्यापिका |

© SHETH Publishing House

## स्वाध्याय

**प्र.१. खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.**

१) पाहुणा - ______ २) काका - ______ ३) आजी - ______

४) भक्त - ______ ५) भावस - ______ ६) बाबा - ______

७) माझा - ______ ८) शिक्षक - ______ ९) पंडित - ______

१०) विद्वान - ______ ११) स्त्री - ______ १२) कर्मयोगी - ______



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

| | | |
|---|---|---|
| १३) साध्वी - ______ | १४) म्हैस - ______ | १५) सूर्यकन्या - ______ |
| १६) धाकटा - ______ | १७) सासरा - ______ | १८) तुझी - ______ |
| १९) माणसे - ______ | २०) पुस्तक - ______ | २१) पृथ्वी - ______ |
| २२) फुगेवाला - ______ | २३) मुलांना - ______ | २४) ऊन - ______ |
| २५) कुत्रा - ______ | २६) नदी - ______ | २७) गुराखी - ______ |

**प्र.२. खालील शब्दांचे वर्गीकरण करुन तक्ता पूर्ण करा.**

कीर्ति, ज्ञानमंदिर, कळस, गाठोडे, सदरा, रस, शाळा, दगड, नानेटी, अंगण, रानमेवा, सहल, शेत, वर्तमानपत्र, मोबाइल, गड, पायथा, अभयारण्य, तारा, गवत, धरती, बाटली, खाऊ, झाड, कुस्ती, सुट्टी, वसतिगृह, तोरण, निसर्ग, बक्षीस, समई, विधवा, शेळी.

| पुल्लिंग (तो) | स्त्रीलिंग (ती) | नपुंसकलिंग (ते) |
|---|---|---|
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# १० वचन

| एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|
| वाट | - | वाटा |
| गोष्ट | - | गोष्टी |
| नदी | - | नद्या |
| साधन | - | साधने |
| खडक | - | खडक |
| रेष | - | रेषा |
| आठवड | - | आठवडे |
| उदाहरण | - | उदाहरणे |
| बी | - | बिया |
| स्त्री | - | स्त्रिया |
| बाग | - | बागा |
| स्वप्न | - | स्वप्ने |
| युग | - | युगे |
| जीभ | - | जीभा |
| तक्रार | - | तक्रारी |
| राज्य | - | राज्ये |
| वडा | - | वडे |
| सर | - | सरी |
| खेळ | - | खेळ |
| शुभेच्छा | - | शुभेच्छा |
| पुरस्कार | - | पुरस्कार |
| सुट्टी | - | सुट्टया |

| एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|
| छंद | - | छंद |
| थाळी | - | थाळ्या |
| दोर | - | दोऱ्या |
| दृश्य | - | दृश्ये |
| दुकान | - | दुकाने |
| भाडे | - | भाडी |
| खोली | - | खोल्या |
| पदक | - | पदके |
| महिना | - | महिने |
| इस्पितळ | - | इस्पितळे |
| इमारत | - | इमारती |
| पाऊल | - | पावले |
| मिशी | - | मिशा |
| ठिपका | - | ठिपका |
| बशी | - | बशा |
| जाळी | - | जाळ्या |
| शेळी | - | शेळ्या |
| शेपटी | - | शेपट्या |
| पावती | - | पावत्या |
| डोळा | - | डोळे |
| पंजा | - | पंजे |
| गंमत | - | गमती |

| एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|
| चोच | - | चोची |
| धडा | - | धडे |
| पणती | - | पणत्या |
| विभाग | - | विभाग |
| कप्पा | - | कप्पे |
| जनावर | - | जनावरे |
| फुगडी | - | फुगड्या |
| पाहुणा | - | पाहुणे |
| पिशवी | - | पिशव्या |
| सरकार | - | सरकारे |
| कोंबडा | - | कोंबडे |
| पैसा | - | पैसे |
| पुस्तक | - | पुस्तके |
| रुपया | - | रुपए |
| होडी | - | होड्या |
| देव | - | देव |
| कविता | - | कविता |
| शत्रू | - | शत्रू |
| भाषा | - | भाषा |
| मन | - | मन |
| सभा | - | सभा |
| विद्या | - | विद्या |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF



## १ समानार्थी शब्द

| शब्द | | समानार्थी शब्द |
|---|---|---|
| पिता | = | वडील |
| सावली | = | छाया |
| सूर्य | = | रवी, भास्कर |
| वेल | = | लता |
| फूल | = | पुष्प, सुमन |
| निसर्ग | = | सृष्टी |
| नदी | = | सरिता |
| जंगल | = | रान, वन |
| धाक | = | वचक |
| पाऊस | = | वर्षा |
| महिना | = | मास |
| काठ | = | किनारा |
| तन | = | शरीर |
| निरंतर | = | सतत |
| नभ | = | आकाश |
| सुवास | = | सुगंध |
| मनोहर | = | सुंदर |
| घर | = | सदन, गृह |
| नाक | = | नासिका |
| कान | = | कर्ण |
| नयन | = | डोळे |

| शब्द | | समानार्थी शब्द |
|---|---|---|
| जीभ | = | जिव्हा |
| हात | = | हस्त, कर |
| पद | = | पाय, चरण |
| सन्मान | = | आदर |
| वारा | = | पवन |
| होडी | = | नाव |
| आठवण | = | स्मरण |
| मंदिर | = | देऊळ |
| बाग | = | बगीचा |
| थंड | = | शीत |
| गिरी | = | पर्वत |
| आयुष्य | = | जीवन |
| शाळा | = | विद्यालय |
| कॉलेज | = | महाविद्यालय |
| छंद | = | आवड |
| निमंत्रण | = | आमंत्रण, आवतान |
| साद | = | हाक |
| संधी | = | मोका |
| गाव | = | खेडे |
| निश्चय | = | निर्धार |
| विश्रांती | = | विसावा |

| शब्द | | समानार्थी शब्द |
|---|---|---|
| सानुली | = | लहान |
| दिन | = | दिवस |
| मुख | = | तोंड |
| मन | = | चित्त |
| अंगुली | = | बोट |
| प्राण | = | जीव |
| स्वैर | = | मुक्त |
| डोळे | = | नयन |
| पाणी | = | जल |
| फायदा | = | लाभ |
| कोवळ्या | = | कोमल |
| नमस्कार | = | वंदन |
| विश्वास | = | खात्री |
| करुणा | = | दया |
| भीती | = | भय |
| चंद्र | = | शशी |
| सागर | = | समुद्र |
| गाणे | = | गीत |
| साम्य | = | समानता |
| श्रीमंत | = | धनवान |
| शिपाई | = | सेवक |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# २ विरुद्धार्थी शब्द

| शब्द | | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|---|
| गुरु | × | शिष्य |
| फायदा | × | तोटा |
| दाट | × | विरळ |
| खेडं | × | शहर |
| ओला | × | सुका |
| तीव्र | × | सौम्य |
| बारीक | × | जाड |
| नवीन | × | जुनी |
| आशा | × | निराशा |
| प्रश्न | × | उत्तर |
| मान | × | अपमान |
| रात्र | × | दिवस |
| आवड | × | नावड |
| खरे | × | खोटे |
| हजर | × | गैरहजर |
| बंदिस्त | × | मोकळा |
| ताजा | × | शिळा |
| शेवट | × | सुरुवात |
| रुंद | × | अरुंद |
| चढण | × | उतरण |
| आशीर्वाद | × | शाप |

| शब्द | | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|---|
| थंड | × | उष्ण |
| चांगला | × | वाईट |
| शिस्त | × | बेशिस्त |
| जिंकणे | × | हरणे |
| आत | × | बाहेर |
| स्वावलंबी | × | परावलंबी |
| खूश | × | नाखूश |
| मित्र | × | शत्रू |
| सोपे | × | कठीण |
| उत्साह | × | निरुत्साह |
| रौद्र | × | सौम्य |
| मृत्यू | × | जन्म |
| सरळ | × | वाकडा |
| खरेदी | × | विक्री |
| सकाळ | × | संध्याकाळ |
| मालक | × | नोकर |
| जास्त | × | कमी |
| जाड | × | पातळ |
| सुरक्षित | × | असुरक्षित |
| सुगंध | × | दुर्गंध |
| इकडे | × | तिकडे |

| शब्द | | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|---|
| पाठी | × | पुढे |
| जवळ | × | दूर |
| लक्ष | × | दुर्लक्ष |
| समाधान | × | असमाधान |
| पांढरी | × | काळी |
| अस्वस्थ | × | अस्वस्थ |
| आंधळी | × | डोळस |
| ओळखी | × | अनोळखी |
| विश्वास | × | अविश्वास |
| रागीट | × | शांत |
| मऊमऊ | × | खरखरीत |
| मंजुळ | × | कर्कश |
| अर्थ | × | अनर्थ |
| साम्य | × | भेद |
| गुण | × | दुर्गुण, अवगुण |
| व्यक्त | × | अव्यक्त |
| स्वार्थ | × | परमार्थ |
| उत्साह | × | निरुत्साह |
| दारिद्र्य | × | श्रीमंती |
| उद्योगी | × | आळशी |
| पाप | × | पुण्य |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ३ वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

❖ खालील वाक्प्रचार वाचा.

१) **दुथडी भरुन वाहणे** - ओसंडून वाहणे.

२) **तहानभूक हरपणे** - कामात मग्न होणे.

३) **हिरमोड होणे** - नाराज होणे.

४) **फरफट होणे** - गैरसमज होणे.

५) **कुरकुर करणे** - तक्रार करणे.

६) **पोटासाठी वणवण हिंडणे** - अन्न मिळवण्यासाठी कष्ट करणे.

७) **पोटभर मार खाणे** - भरपूर मार खाणे.

८) **काळजाला घरे पडणे** - प्रचंड दु:ख होणे.

९) **अंगावर काटे येणे** - प्रचंड भीती वाटणे.

१०) **मनमानी करणे** - मनाला वाटेल तसे वागणे.

११) **हैराण होणे** - त्रासून जाणे.

१२) **साद घालणे** - हाक मारणे.

१३) **प्रशंसा करणे** - स्तुती करणे.

१४) **कानोसा घेणे** - चाहूल घेणे.

१५) **पसार होणे** - पळून जाणे.

१६) **राबणे** - कष्ट करणे.

१७) **आवाहन करणे** - विनंती करणे.

१८) **हालवून सोडणे** - अस्वस्थ करणे.

१९) **कावरेबावरे होणे** - गोंधळून जाणे.

२०) **अंगावर तुटून पडणे** - जोराचा हल्ला करणे.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ४ म्हणी

## ❖ खालील म्हणी वाचा.

१) मूर्ती लहान पण कीर्ती महान.

२) रात्र थोडी आणि सोंगे फार.

३) शितावरुन भाताची परीक्षा.

४) घरोघरी मातीच्या चुली.

५) सुंठीवाचून खोकला गेला.

६) कोल्ह्याला द्राक्ष आंबट.

७) उथळ पाण्याला खळखळाट फार.

८) अंथरूण पाहून पाय पसरणे.

९) दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ.

१०) इकडे आड. तिकडे विहीर.

११) झाकली मूठ सव्वालाखाची.

१२) काखेत कळसा आणि गावाला वळसा.

## ❖ शरीराच्या भागावरून तयार झालेल्या म्हणी.

१) कानामागून आली तिखट झाली.

२) भित्यापाठी ब्रह्मराक्षस.

३) नाकापेक्षा मोती जड.

४) पाठीवर मारा पण पोटावर मारू नका.

५) हातच्या कंकणाला आरसा कशाला.

६) आपलेच दात आपलेच ओठ.

७) हात दाखवून अवलक्षण.

८) चोराच्या मनात चांदणे.

९) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.

१०) मन चिंती ते वैरी न चिंती.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

११) आपल्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही.

१२) उचलली जीभ लावली टाळ्याला.

१३) दुसऱ्याच्या डोळ्यातील कुस दिसते.

१४) माती मऊ लागली म्हणून कोपरापासून खणू नये.

### ❖ जनावरांवरून तयार झालेल्या म्हणी.

१) गाढवाला गुळाची चव काय.

२) गाढव गेलं आणि ब्रह्मचर्य ही गेलं.

३) बैल गेला आणि झोपा केला.

४) शेळी जाते जीवानीशी खाणारा म्हणतो वातड.

५) हत्ती गेला आणि शेपूट राहिलं.

६) अति शहाणा त्याचा बैल रिकामा.

७) आयत्या बिळावर नागोबा.

८) वासरात लंगडी गाय शहाणी.

९) आंधळं दळत आणि कुत्र पीठ खातं.

१०) मेल्या म्हशीला मणभर दूध.

११) अगं अगं म्हशी मला कुठं नेशी?

१२) कुत्र्याचं शेपूट नळीत घातलं तरी वाकडंच.

१३) कोल्हा काकडीला राजी.

१४) बैल गेला ओझ्याने, शिंगरू गेलं हेलपाट्याने.

१५) उंदराला मांजर साक्ष.

१६) वाघ म्हटलं तरी खाणार, वाघोबा म्हटलं तरी खाणार.

©SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## स्वाध्याय

**प्र.१ खालील म्हणी पूर्ण करुन लिहा.**

१) गर्जेल तो ____________

२) चार दिवस सासुचे, ____________

३) ज्याची खावी पोळी ____________

४) तळे राखील तो ____________

५) दुरुन डोंगर ____________

६) पळसाला ____________

७) पुढच्यास ठेच ____________

८) बळी तो ____________

९) खाण तशी ____________

१०) हजीर ____________

११) साखरेचे खाणार ____________

१२) ऐकावे जणाचे ____________

१३) गरज सरो ____________

१४) थेंबे थेंबे ____________

१५) दाम करी ____________

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ५ जोडशब्द

❖ **वाचा व समजून घ्या -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सजलेधजले | कामधाम | पुरणपोळी | मीठभाकरी | कपडालत्ता |
| पैसाअडका | बाजारहाट | सोनेनाणे | चहापाणी | आरडाओरड |
| सहजासहजी | गोरगरीब | खाऊनपिऊन | गोडधोड | इकडेतिकडे |
| नाचगाणे | ताटवाटी | अवतीभवती | घरदार | केरकचरा |
| भोळाभाबडा | पशुपक्षी | पाटीपेन्सिल | काबाडकष्ट | कागदपत्र |
| धनधान्य | शेजारीपाजारी | गाडीघोडा | हसतखेळत | वाजतगाजत |
| रडतखडत | झाडलोट | कावरीबावरी | ऊनसावली | शिवणापाणी |
| पालनपोषण | तहानभूक | चढउतार | अंथरुणपांघरुण | इकडूनतिकडून |

❖ **खालील शब्दांना 'भर' हा शब्द जोडून तयार केलेली वाक्ये -**

पिशवी**भर** - बाबांनी माझ्यासाठी **पिशवीभर** खेळणी आणली.
हात**भर** - ताईने **हातभर** बांगड्या घातल्या.
घर**भर** - ताई तिचा मोबाईल **घरभर** शोधत होती.
ढीग**भर** - फळवाल्याच्या हातगाडीवर **ढीगभर** संत्री होती.
रात्र**भर** - मला ताप आला होता तेव्हा आई **रात्रभर** जागी होती.
जग**भर** - सचिन तेंडुलकरची किर्ती **जगभर** पसरली आहे.
कण**भर** - आपल्याकडील **कणभर** का होईना दुसऱ्याला द्यावे.
दिवस**भर** - परीक्षा संपल्यावर मी **दिवसभर** खेळणार.
क्षण**भर** - गावाला जाताना वाटेत आम्ही **क्षणभर** विश्रांती घेतली.

## स्वाध्याय

**१) 'प्राणदाता' या शब्दाप्रमाणे खालील शब्दांना 'दाता' जोडून शब्द तयार करा:**

| | | | |
|---|---|---|---|
| १) अन्न ______ | २) कर ______ | ३) जन्म ______ | ४) रक्त ______ |
| ५) धन ______ | ६) वर ______ | ७) जीवन ______ | ८) जल ______ |

**२) खालील शब्दांच्या आधी 'प्रति' शब्द जोडा: जसे - 'प्रतिध्वनी'.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) ______ वर्षी | २) ______ क्षण | ३) ______ कार | ४) ______ दिनी |
| ५) ______ मास | ६) ______ बिंब | ७) ______ पालक | ८) ______ योगिता |



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ६ उपसर्ग

❖ वाचा व समजून घ्या -

१) 'गैर' उपसर्ग जोडून शब्द -

अ) हजर - गैरहजर आ) सोय - गैरसोय इ) समज - गैरसमज
ई) मार्ग - गैरमार्ग उ) समजूत - गैरसमजूत ऊ) वापर - गैरवापर
ए) फायदा - गैरफायदा ऐ) व्यवहार - गैरव्यवहार ओ) व्यवसाय - गैरव्यवसाय

२) 'बिन' उपसर्ग लावून तयार होणारे शब्द -

अ) पगारी - बिनपगारी आ) व्याजी - बिनव्याजी इ) तारी - बिनतारी

३) 'परा' उपसर्ग लावून तयार होणारे शब्द -

अ) वलंबी - परावलंबी आ) जय - पराजय इ) धीन - पराधीन
ई) भूत - पराभूत उ) कोटी - पराकोटी

४) 'प्रति' उपसर्ग लावून तयार होणारे शब्द -

अ) बिंब - प्रतिबिंब आ) कार - प्रतिकार इ) शब्द - प्रतिशब्द
ई) वर्षी - प्रतिवर्षी उ) मास - प्रतिमास ऊ) क्षण - प्रतिक्षण
ए) कार - प्रतिकार ऐ) दिनी - प्रतिदिनी ओ) योगिता - प्रतियोगिता

५) 'अप' उपसर्ग लावून तयार होणारे शब्द -

अ) राध - अपराध आ) मान - अपमान इ) शब्द - अपशब्द
ई) कार - अपकार उ) यश - अपयश ऊ) -

© SHETH Publishing House

## स्वाध्याय

१) 'बे' हा उपसर्ग लावून खालील शब्द तयार करा व लिहा.

१) जबाबदार ______ ५) पर्वा ______
२) इमान ______ ६) दरकार ______
३) शिस्त ______ ७) नामी ______
४) रोजगार ______ ८) फिकीर ______



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF



# १ निबंध लेखन

## १) माझा आवडता प्राणी - कुत्रा

माझा आवडता प्राणी आहे माझा कुत्रा. त्याचे नाव आहे टॉमी. हे नाव मीच ठेवले आहे. बाबांनी त्यांच्या मित्राकडून टॉमीला माझ्या वाढदिवसा दिवशी आणले. इतकी छान भेट पाहून मी तर उड्याच मारल्या.

आता टॉमी दोन वर्षांचा आहे. त्याच्या अंगावर भुरे व पांढरे केस आहेत. त्याचे डोळे निळसर आहेत व खूप चमकतात. जरा कुठे आवाज झाला की तो आपले कान टवकारतो व भुंकतो. टॉमी दिवसभर माझ्या भोवती असतो. माझ्या बरोबर चेंडू खेळतो. मी अभ्यास करताना टेबलाखाली बसतो. मी शाळेत गेलो की त्याला करमत नाही. तो माझी वाट पहात दारातच बसतो आणि माझी शाळेची बस आली की उड्या मारत येतो.

मी टॉमीसाठी एक छोटे घर केले आहे. ते गॅलरीमध्ये ठेवले आहे. त्यात छोटी गादी, त्याच्या जेवणासाठी एक कटोरी ठेवली आहे. तो पाव, दूध व बिस्कीटे खातो. कधीकधी मांसाहार दिला की तो खूष असतो.

तो आमच्या घराची रखवाली करतो. घरातल्या सगळ्यांचा तो आवडता आहे. सकाळीच तो आजोबांना पेपर नेऊन देतो. माझे मित्र घरी आले की त्यांच्याबरोबर खेळतो. असा हा टॉमी माझा आवडता प्राणी आहे.

## २) मी पक्षी झालो तर किंवा मला पंख असते तर

सर्व मुलांना कशाचा कंटाळा येत असेल तर तो अभ्यासाचा. मलाही अभ्यासाचा खूप कंटाळा येतो. स्वच्छंद आयुष्य जगावे असे वाटते. रोजच्या त्याच त्या जगण्यापेक्षा काहीतरी नवीन अनुभवावे असे वाटले. त्यातच बाईंनी निबंध लिहायला दिला. "मी पक्षी झालो तर......." वा! काय सुंदर विषय आहे. मी तर कल्पनेच्या भराऱ्या मारु लागलो.

पक्षी म्हणजे फ्री बर्ड! त्यामुळे मी कोणताही पक्षी झालो तरी मला चालेल. सर्वात सुखद गोष्ट म्हणजे अभ्यास नाही, परीक्षा नाही, स्पर्धा नाही काही काही सुद्धा नाही. फक्त आनंदच आनंद. मजेत राहणे, मिळेल ते खाणे मनात येईल तेथे हिंडणे......किती मज्जाच मजा!

या झाडावरुन त्या झाडावर हुंदडणे. निरनिराळी गोड, चविष्ट फळे चाखणे. इतर मित्रांशी दोस्ती करणे उन्हा-तान्हात, पाऊस-पाण्यात, थंडी-वाऱ्यात एखाद्या डेरेदार वृक्षाचा आधार घेणे. थोडे दिवस तेथे



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

राहायचे बस्स! मग लगेच पुढच्या प्रवासाला जायचे. तसेही मला फिरायची फार आवड आहे. पक्षी झालो तर माझी ही आवड, इच्छा मला हवी तशी मी पूरी करीन. देश-विदेशात मस्तपैकी हिंडून येईन. तिथल्या ऋतूंचा जीवनाचा अनुभव घेईन. तिथल्या खाण्या-पिण्याचा आस्वाद घेईन बरे-वाईट अनुभव घेईन. ठिकठिकाणी हिंडताना आरक्षणाची गरज नको, सामानाची बांधाबांध तिकिटासाठी रांगेत उभे राहणे, पासपोर्ट काढणे उत्यादी कटकटींपासून सुटका मिळेल. मी पक्षी झालो तर... फायदेच फायदे होतील. स्वातंत्र्य म्हणजे काय याचे हे उत्तम उदाहरण असेल.

आकाशात उंच विहार करत असताना खाली दिसणारे विहंगम दृश्य मन मोहून टाकणारे असल. या स्वप्नाच्या दुनियेत वावरताना 'मी पक्षी झालो तर .......' हा निबंध कधी लिहून झाला मला माझेच कळलेच नाही.

## ३) माझा आवडता खेळ

शरीर व मन निरोगी राहण्यासाठी जशी व्यायामाची आवश्यकता आहे तशीच खेळाचीही. कुठल्याही खेळात नुसतेच बळ असून चालत नाही तर त्याला बुध्दीचीही जोड हवी. तरच तो खेळ खेळण्यात मजा आहे. आपल्या भारतात जो लोकप्रिय खेळ आहे तोच माझा ही आवडता खेळ आहे तो म्हणजे 'क्रिकेट'.

हा खेळ दिवसेंदिवस अधिक लोकप्रिय होत चालला आहे. त्यातही एकदिवसीय खेळाने तर सर्व उच्चांक मोडले आहेत. झटपट खेळ आणि तितक्याच झटपट निकाल. निरनिराळ्या देशांमधील चुरस बघताना जो तो आपल्या परीने अंदाज बांधत असतो. कधी कधी बलाढ्य संघ अंतिम फेरीत हरताना पाहून खूप जणांना हळहळ वाटते.

दुरदर्शनचा शोध लागण्यापूर्वी लोकांसमोर दोनच पर्याय होते. एकतर प्रत्यक्ष स्टेडिअमवर जाऊन क्रिकेटचा आनंद लुटणे अथवा रेडिओवर त्यांचे समालोचन ऐकणे. या दो पर्यायामध्ये एक समान गुण होता तो म्हणजे चौकार, षटकार मारल्यावर किंवा खेळाडू बाद झाल्यावर होणारा हल्लागुल्ला. लोक वय विसरुन असेल त्या ठिकाणी या खेळाचा आनंद व्यक्त करताना दिसतात. आजकाल आपण दूरदर्शनवर सामने पाहू शकतो. त्याचा एक फायदा असा की आपण दृश्य परत परत पाहू शकतो.

क्रिकेट हा खेळ असा आहे की आपण तो कुठेही, कधीही खेळू शकतो. दूरदर्शनवरचे सामने संपल्यावर सर्व मुलांच्या अंगात सचिन तेंडुलकर किंवा त्यांचा आवडता खेळाडू संचारतो. आणि मग सुट्टीच्या दिवशी रस्त्यांवर, गल्लीबोळात, अंगणात व अगदी चौपाटीवर सुध्दा मुलांचे घोळके हातात चेंडू व बॅट घेऊन फिरताना दिसतात. पुरेशी साधनसामुग्री नसतानाही मिळेल त्या साधनात मुले जमवून घेतात. स्टंपच्या ऐवजी कधी टायर, दगड, बॅटच्या ठिकाणी एखादे लाकडी फळकुट घेऊन आपली हौस

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

भागवतात. आता तर रात्रीचेही सामने होऊ लागले आहेत. पण त्यातही गंमत अशी की प्रत्येकाने आपआपल्या सोयीने नियमांत थोडासा बदल केला आहे. हा सगळा दूरदर्शनचा परिणाम, खेळाडूंची लोकप्रियता व खेळावरील प्रेम !

अरुंद गल्ली किंवा रस्त्याच्या मधोमध मुले इतकी भान हरपून खेळत असतात की त्यामुळे आपल्या हातून घराची काच फुटू शकते किंवा रस्त्यावरील माणसाला चेंडू लागू शकतो हे त्यांच्या ध्यानात येत नाही. खेळण्याच्या नादात एखादी काच फुटणे, मग मुलांची पळापळ, ज्याची काच तुटली त्याची ओरडाओरड, थोडावेळ शांत झाल्यावर मुलांचे परत क्रिकेट खेळणे हे मुंबईकरांना काही नवीन नाही. हे नेहमीचेच झाले आहे. अशा ह्या आजुबाजूचे जग विसरायला लावणाऱ्या खेळाची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. उत्तरोत्तर ती वाढतेच आहे.

## ४) मी केलेली सहल

आमची मुंबईतील जवळ जवळ सर्वच ठिकाणे पाहून झाली आहेत. तेव्हा मुंबईबाहेर सहलीला जावे यावर सर्वांचे एकमत झाले. शेवटी नदीकाठी सहलीला जाण्याचे ठरले. मुंबईत समुद्र पाहायला मिळतो. पण नद्या नाहीत.

आम्ही सर्व नाशिकला गोदावरी नदीच्या काठी जाण्याचे ठरविले. मी व माझे नातेवाईक आदल्या दिवशी रात्री नाशिकला पोहोचलो. सकाळी लवकर उठून नदीवर गेलो. शहरापासून दूर नदीकाठच्या वातावरणामुळे सर्व आनंदी, उत्साही दिसत होते.

नदीकाठचा परिसर शांत होता. हवा पण थंड होती. आजूबाजूला कसलाही आवाज नव्हता. हळूहळू सूर्याची किरणे चारही दिशांना पडू लागली. त्या कोवळ्या किरणात आजूबाजूचा परिसर अधिकच सुंदर दिसू लागला. नदी झुळझुळ वाहत होती. जणू काही ती गाणेच म्हणत आहे व पुढे जाण्याचा संदेश देत आहे असे वाटत होते.

नदी तुडुंब भरली होती. गावातील तरुण मुले नदीच्या पाण्यात मनसोक्त डुंबत होती. लहान मुले काठावर बसून लाटांबरोबर खेळत होती. पाण्यात पाय घालवत नव्हता एवढे पाणी थंड होते. हळूहळू नदीच्या काठी माणसांची, जनावरांची गर्दी होऊ लागली. बायका कपडे धूत होत्या. काही लोक जनावरांना अंघोळ घालत होते. नदीच्या जवळच मंदिरे होती. तेथे जाऊन आम्ही देवदर्शन घेतले.

हळूहळू ऊन वर येत होते. दुपारच्या कडक ऊन्हात नदीचे पाणी चमकत होते. आता नदीकाठचा गजबजाट कमी झाला होता. निसर्गाच्या सान्निध्यात असल्याने थकवा जाणवत नव्हता. शहरातल्या गजबजाटाचा, गर्दीचा, आरडाओरडीचा, प्रदूषणाचा तेथे त्रास नव्हता. सूर्य आता मावळतीला जात होता. आमचा तेथून पाय निघत नव्हता. या पवित्र नदीला नमस्कार करुन आम्ही घरी परतलो.



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ५) श्रमाचे महत्व

माणसाला जशी आहाराची आवश्यकता आहे तशीच श्रमाचीसुद्‌धा आवश्यकता आहे. माणसाने मेहनत केली नाही तर तो आळशी बनेल. ‘आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे.’ स्वत:ची व देशाची प्रगती करायची असेल तर कष्ट करायलाच हवेत.

श्रम केल्याने माणूस स्वावलंबी बनतो. आपल्या मेहनतीचे चांगले फळ त्याला मिळाले की माणूस आनंदी राहतो. स्वत: काम केल्याचे समाधान मिळते. नवीन काम करण्याची जिद्द निर्माण होते. आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वासाच्या बळावर निरनिराळी आव्हाने आपण स्वीकारतो. श्रम केल्यानेच यशाचे शिखर गाठता येते.

श्रमाची आवश्यकता जशी गरिबांना आहे तशीच ती श्रीमंतांनासुद्‌धा आहे. दिवसभर खूप परिश्रम करणारा गरीब मजूर रात्री सुखाने झोपी जातो. श्रीमंत परंतु आळशी माणूस सर्व सुखे असूनही रात्री सुखाने झोपू शकत नाही. एकदा माणसाला कष्ट करण्याची सवय लागली की त्याला रिकामे बसवत नाही. काही माणसांना दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची सवय असते. कष्ट करण्याची सवय व तयारी नसल्याने ते परावलंबी बनतात. मग अशा लोकांच्या मागे आजारपण हात धुवून लागते. तेव्हा त्यांना श्रमाचे महत्व कळते.

यंत्रे जर वर्षानुवर्षे बंद राहिली तर ती गंजतात, त्याप्रमाणे शरीराला जर व्यायाम, हालचाल व चालना नसेल तर देवाने दिलेले हे अवयव निकामी होतील. अवयवांची हालचाल पूर्णपणे थांबेल. अशा अवस्थेत जिवंत राहण्याला काही अर्थच उरणार नाही. ‘दे रे हरी खाटल्यावरी’ म्हणजेच जरासुद्‌धा श्रम न करता बसल्या जागी यश मिळवण्याची आशा कोणी धरु नये.

माणसाने काम करताना ते हलक्या प्रतीचे किंवा उच्च प्रतीचे असा भेदभाव करु नये. त्याला लहान-सहान कामे करण्याची लाज वाटू नये. निरनिराळी उद्‌दीष्टये साध्य करण्यासाठी श्रमाची गरज आहे. श्रमाबरोबर यश हातात हात घालून येते. तर आळसाबरोबर अपयश येते. श्रम करणाऱ्यांच्या मागे नेहमीच परमेश्वर असतो. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम केले तर परीक्षेत त्यांना हमखास यश मिळेल. त्यांचा भविष्यकाळ सुखाचा जाईल. महान व्यक्तींचे चरित्र वाचले तर जाणवते की त्यांना कठोर परिश्रम करुन यश, किर्ती व पैसा प्राप्त झाले.

आजच्या यंत्रयुगात माणूस यंत्राच्या सहाय्याने कामे करु लागला आहे. त्यामुळेच त्याला शरीर निरोगी ठेवण्यासाठी भरमसाठ फी देऊन व्यायामशाळेत जावे लागते. पूर्वी यंत्रांचे शोध लागले नव्हते. जात्यावर दळणे, विहीरीतून पाणी काढणे इ. यासारखी कामे माणसे स्वत: करत. त्यामुळे शरीराला आपोआप व्यायाम मिळत असे. कोणत्याही व्यायामशाळेत जाण्याची त्यांना गरज भासली नाही. म्हणूनच कठोर परिश्रमांना पर्याय नाही असे म्हटले जाते.



©SHETH Publishing House
THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ६) माझे आवडते संत

जे का रांजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।

या ओळी संत तुकाराम यांच्या. तुकारामांचे म्हणणे असे होते की ज्याला रांजल्या, गांजलेल्यांचा, अनाथाचा कळवळा वाटतो तोच खरा साधू. शंत तुकारामही असेच होते. त्यांना गरिबांविषयी, अनाथांविषयी अपार माया होती. त्यांना ते आपले म्हणत म्हणून तर लोक त्यांना 'संत' म्हणतात.

संत तुकाराम यांचा जन्म १६०८ मध्ये देहू या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बोल्होब व आईचे नाव कनकाई होते. ते दोघेही अतिशय प्रेमळ होते. तुकाराम १२-१३ वर्षाचे असतानाच त्यांचे लग्न झाले. नेमाने आणि नेकीने ते प्रपंचाचा गाडा रेटीत होते. त्यांच्या वडिलांचे एक दुकान होते. ते दुकान तुकाराम चालवत होते. प्रामाणिकपणे व्यापार करुन चार पैसे मिळवत होते. नितळ व निर्मळ मनाचे तुकोबा उदार मनाचेही होते. दुकान चालवून जे पैसे मिळत ते स्वत:जवळ न ठेवता गरजू लोकांना देऊन टाकत. त्यामुळे दुकान चालेनासे झाले. त्यातच दुष्काळ पडला. आई वडील गेले. त्यामुळे ते खूप दु:खी झाले. त्यांची पत्नीही गेली. त्यामुळे त्यांना कशातच रस वाटेना. ते पांडुरंगाची भक्ती करु लागले. भक्ती करण्यास त्रास होऊ नये म्हणून ते डोंगरावर जाऊन बसू लागले.

त्यांनी खूप अभंग रचले. अभंगांद्वारे त्यांनी समाजातील ढोंगावर, बुवाबाजीवर टीका केली. समाज व धर्म प्रबोधनही केले. त्यांना सामान्यांबद्दल कळवळा होता. मानवकल्याणाची तळमळ होती. त्यांना साध्या माणसामध्येही देव दिसू लागला. येणाऱ्या जाणाऱ्यांची ते प्रेमाने विचारपूस करत. कोणाची कोठे उतरायची सोय नसेल तर आपल्याकडे नेऊन जेवू घालत. त्यांना स्वत:ला जे मिळत त्यातूनच ते दुसऱ्यांना मदत करीत. त्यांच्या बायकोला व मुलांना पुरेसे अन्न नव्हते. पण भुकेलेल्यांविषयी, अनाथांविषयी त्यांना कळवळा होता. त्यांच्या अभंगातून ते देवाकडे लहानपण मागतात. कारण त्यांच्या मते लहानपणात सुख असते. माणूस जितका मोठा तितक्या त्याला यातना जास्त. ते म्हणतात संतपण कोठे बाजारात, रानावनात मिळत नाही. इतकेच नाही तर पैसे देऊनही मिळत नाही. तर जो सर्वस्व त्याग करायला तयार असतो त्यालाच संतपण प्राप्त होऊ शकते.

संत तुकाराम रात्री कीर्तन करत. कीर्तनात स्वत:च रचलेले अभंग म्हणत. स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत त्यांत्या कीर्तनाला येत. त्यांना पैशाचा लोभ नव्हता. ते म्हणत की लोकांसाठी झटणे हीच माझी श्रीमंती. यानेच देव भेटतो.

१६५० मध्ये ते वैकुंठवासी झाले. ते प्रेमळ, परोपकारी होते, चांगली शिकवण देणारे होते, म्हणून ते मला आवडतात.



©SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ७) माझा आवडता शिक्षक

माझी वर्गशिक्षिका माझी आवडती शिक्षिका आहे. तिचे राहणीमान अगदी साधे आहे. ती नेहमी प्रसन्न व हसतमुख असते. तिला स्वस्थ बसायला आवडत नाही. तिच्या अवती भोवती नेहमी विद्यार्थ्यांचा गराडा असतो. फावल्या वेळात ती ग्रंथालयात विविध पुस्तके वाचण्यात दंग असते.

माझी वर्गशिक्षिका आम्हाला मराठी विषय शिकवते. आमच्या वर्गात मराठी मातृभाषा नसलेले बरेच विद्यार्थी आहेत. त्यामुळे त्यांना हा विषय सुरवातीपासूनच अवघड वाटत आला आहे. ह्या शिक्षिकेमुळे सर्वांना या विषयात गोडी निर्माण झाली आहे. या विषयाची आता त्यांना भिती वाटत नाही. या विषयाचा तास कधी संपू नये असे सर्वांना वाटते.

माझ्या वर्गशिक्षिकेच्या शिकविण्याच्या पध्दतीमुळे आम्हाला कठीण विषयसुध्दा अतिशय सोपा वाटतो. मराठी विषयाव्यतिरिक्त अन्य विषयांमध्ये ती आम्हाला मदत करते. प्रत्येक लहान-सहान गोष्टी ती समजावून देते. त्यामुळे ती आम्हाला मैत्रिणीसारखी वाटते. ती आमची वर्गशिक्षिका असल्याने तिचे आमच्याकडे बारकाईने लक्ष असते. ती स्वत: टापटीप असते व आम्हाला टापटीप, व्यवस्थित राहण्यास शिकवते. अभ्यासात मागे असणाऱ्यांकडे ती जास्त लक्ष देते.

शिक्षणाची सुरुवात ही प्रत्येकाच्या घरापासून होते. लहानपणी आई मुलांवर संस्कार करते. तसेच संस्कार शाळेत शिक्षक करतात. माझ्या वर्गशिक्षिकेने आम्हाला चांगल्या सवयी लावल्या आहेत. उदा. दुसऱ्यांना मदत करणे, इतरांचे कौतुक करणे, मोठ्यांचा आदर करणे इत्यादी. ती आम्हाला प्रत्येक बाबतीत पुढे आणू इच्छिते. त्यासाठी वेळोवेळी ती आम्हाला मार्गदर्शन करते. आमचा उत्साह वाढवते, प्रोत्साहन देते. त्यामुळेच आमचा सर्वांगिण विकास होऊ शकला. कधी कधी ती आमच्यावर रागवते. पण ते आमच्या चांगल्यासाठीच असते. आई जसे आपल्या मुलांवर समान प्रेम करते तशीच आमची वर्गशिक्षिका आम्हां सर्व विद्यार्थ्यांवर सारखेच प्रेम करते. ती कोणामध्ये भेदभाव करीत नाही. आईसारखी ती आमची काळजी घेते. म्हणूनच शाळा आम्हाला आमचे घर वाटते.

आज पंचवीस वर्षांहून जास्त काळ झाला तरी ती मराठी विषय तितक्याच उत्साहाने, सहजतेने शिकवित आहे. तिच्या हाताखालून गेलेले अनेक विद्यार्थी आज चांगल्या पदावर आहेत. आजही शिक्षक दिनी ते सर्व न विसरता तिला भेटायला येतात. यावरुन ती विद्यार्थ्यात किती प्रिय होती हे कळते. तिला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. आदर्श शिक्षक पुरस्कार तिला या वर्षी मिळाला. अशी शिक्षिका आम्हाला जन्मोजन्मी मिळो ही आमची देवाकडे प्रार्थना आहे. तिला शतश: प्रणाम!

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ८) जैव विविधतेची गरज

जैव म्हणजे जीव. निसर्ग अनेक घटकांनी बनलेला आहे. ज्यात प्राणी, पक्षी, झाडे, नदी, पर्वत, समुद्र, इत्यादी या जीवसृष्टीचा (जैव) समावेश होतो. निसर्गाने निर्माण केलेल्या या सजीव सृष्टीत आकार, रंग, रुप, वैशिष्ट स्वभाव इत्यादी बाबतीत विविधता आढळते.

या सजीव सृष्टीमुळे निसर्गाचे सौंदर्य अधिकच खुलून येते. निसर्गात इतकी विविधता नसती तर एकसुरीपणा, रुक्षपणा, सर्वत्र पसरला असता. निसर्गातील प्रत्येक सजीव नैसर्गिक साखळीद्वारे एकमेकांवर अबलंबून आहे त्यामुळे ही सजीव सृष्टी निसर्गाचा समतोल राखते.

निसर्गाच्या नवनिर्मितीच्या कार्यात या जीव सृष्टीचा मोलाचा वाटा आहे. उदा. पक्षी आपले अन्न खात असताना बीया जमिनीवर पडतात. त्यातून नवीन झाड उगवते. वाऱ्याबरोबर परागकण इतस्त: पसरतात त्यातून नवीन फुलांची निर्मिती होते. स्थलांतरित पक्ष्यांमुळे विविधतेत अधिक भर पडते. या सर्व सजीव सृष्टीचे मानवाशी जवळचे नाते आहे. मानवाच्या जीवनाशी जेव्हा यांचा संबंध येतो तेव्हा त्याचे जीवन यांच्या अस्तित्वामुळे सुखकर होते. म्हणूनच जैवविविधतेची आज गरज आहे.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# २ पत्रलेखन

**पत्रांचे दोन प्रकार अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहेत.**

**अ) औपचारिक पत्र (Formal Letters)**

**ब) अनौपचारिक पत्र (Informal Letters).**

## अ) औपचारिक पत्र (Formal Letters)

ह्या प्रकारची पत्रे कार्यालयीन कामकाजासाठी लिहिली जातात. या पत्रांचा साचा ठरलेला असतो. ही पत्रे कामाशी संबंधित असल्यामुळे यातील भाषा अचूक, स्वच्छ व सुटसुटीत असते. विषयाची मांडणी मुद्देसुद व थोडक्यात असावी. खालील सुचना लक्षात ठेवा.

१. डाव्या बाजूच्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता व दिनांक लिहावा.

२. यानंतरच्या ओळीत समासाजवळ थोडी जागा सोडून ज्याला पत्र लिहायचे आहे त्यांचा हुद्दा व पत्ता लिहावा.

३. सन्माननीय संबोधन जसे महोदय, महोदय वगैरे लिहावे.

४. त्याखालील ओळीत पत्राचा विषय, थोडक्या शब्दांमध्ये लिहावा किंवा काही संदर्भ असेल तर त्याचा उल्लेख करावा.

५. त्यानंतर मोजक्या शब्दात विषयाची मांडणी वगैरै करावी.

६. पत्राच्या शेवटी विषयानुसार धन्यवाद देऊन किंवा तसदीबद्दल माफी मागुन पत्राचा समारोप करावा.

७. पत्राच्या शेवटी डाव्या कोपऱ्यात खालच्या बाजुला आवश्यकतेनूसार आपला आपली विश्वासू किंवा आज्ञाधारक लिहून पत्र लिहिणाऱ्याचे नाव लिहावे.

८. पत्र पूर्ण झाल्यावर त्याखाली लिफाफा तयार करावा. उजव्या बाजुला, ज्याला पत्र पाठवायचे आहे त्याचा प्रति म्हणून उल्लेख करून पूर्ण पत्ता लिहावा.

९. डावीकडील कोपऱ्यात थोडे खालच्या बाजूला प्रेषक म्हणून उल्लेख करून पत्र पाठविणाऱ्याचा पूर्ण पत्ता लिहावा.

१०. लिफाफा काढायला विसरु नये. तो अनिवार्य भाग आहे.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ब) अनौपचारिक पत्र (Informal Letters)

ह्या प्रकारची पत्रे कार्यालयीन कामकाजासाठी लिहिली जातात. या पत्रांचा साचा ठरलेला असतो. ही पत्रे कामाशी संबंधित असल्यामुळे यातील भाषा अचूक, स्वच्छ व सुटसुटीत असते. विषयाची मांडणी मुद्देसुद व थोडक्यात असावी. खालील सुचना लक्षात ठेवा.

ह्या प्रकारची पत्रे साधारणपणे आपले जवळचे नातेवाईक, मित्र, मैत्रिणींना लिहिली जातात.

१) ही पत्रे लिहिताना पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता, दिनांक, लिफाफा, प्रति, प्रेषक, या सर्व गोष्टी औपचारिक पत्राप्रमाणेच करायच्या ओहत.

२) ही पत्रे लिहिताना आपल्या नातेसंबंधाप्रमाणे मायना बदलावा. पत्राच्या शेवटी नातेसंबंधाप्रमाणेच नमस्कार / आशिर्वाद लिहावा.

३) या पत्रातून एकमेकांबद्दल जिव्हाळा, आपलेपणा, व्यक्त व्हावा.

४) आपल्या मनातील भावना, विचार, कल्पना या पत्रातून आपण सहजतेने मांडू शकतो.

५) भाषा अर्थातच घरगुती, सोपी व थोडी लडिवाळ असली तरी हरकत नाही.

### औपचारिक पत्र

| जिला पत्र लिहायचे ती व्यक्ती | सुरुवात | शेवट |
|---|---|---|
| १) अधिकारी | मान्यवर - महोदय/महाशय, स.न.वि.वि. | आपला / आपली विश्वासू |
| २) शिक्षक / मुख्याध्यापक | माननीय पूज्य गुरुवर्य सा.न.वि.वि | आपला / आपली आज्ञाधारक |
| ३) सन्माननीय व्यक्ती | माननीय महाशय / महोदय सा.न.वि.वि | आपला / आपली नम्र |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## अनौपचारिक पत्र

| जिला पत्र लिहायचे ती व्यक्ती | सुरुवात | शेवट |
|---|---|---|
| १) वडील | ती.बाबांना, शि.सा.न.वि.वि. | आपला / आपली मुलगा / मुलगी |
| २) आई | ती.सौ.आईस, शि.सा.न.वि.वि | तुझा /तुझी मुलगा / मुलगी |
| ३) इतर वडील मंडळीना - आजी आजोबा, काका काकु, मामा मामी, मावशी, आत्या | ती.स्व. काकांना/ मामांना शि.सा.न.वि.वि. ती.सौ. काकूला / मामीला, शि.सा.न.वि.वि. | आपला / आपली |
| ४) मोठा भाऊ / दादा | ती. दादाला स.न.वि.वि. | तुझा / तुझी |
| ५) मोठी बहीण / ताई | ती. सौ. ताईस (विवाहित असेल तर) अन्यथा ती. ताईस, सा.न.वि.वि. | तुझा / तुझी |
| ६) लहान भाऊ / बहीण | चि. .......... यास हिस अनेक आशिर्वाद | तुझा / तुझी |
| ७) मित्र/ मैत्रिणी | प्रिय मित्र /प्रिय मैत्रिण सप्रेम नमस्कार वि.वि. | तुझा /तुझी मित्र /मैत्रिण |

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## औपचारिक पत्र

**१. तुम्हास आवश्यक असलेल्या पुस्तकांची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकस आयडियल पुस्तकालय, दादर, मुंबई, यांना लिहा. लिफाफा आवश्यक.**

क्ष
विद्यार्थी प्रतिनिधी
विवेक विद्यालय,
सिध्दार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६२.
दिनांक - ५-२-२०___

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
आयडियल पुस्तकालय,
दादर.

**विषय** : पुस्तकांची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,

मी विवेक विद्यालय या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी असून आमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करण्यासाठी हे पत्र पाठवीत आहे.

आम्ही दरवर्षी आपल्याकडूनच पुस्तके खरेदी करतो. खाली दिलेल्या पुस्तकांच्या यादीप्रमाणे सर्व पुस्तके लवकरात लवकर वरील पत्यावर पाठवावीत. पुस्तकांच्या पार्सलासोबत आपले बीलही पाठवले तर आम्ही रक्कम त्वरीत पाठवून देऊ.

**पुस्तकांची यादी**

| पुस्तकांचे नाव | इयत्ता | लेखकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| मराठी सुलभभारती | इ.८वी | -- | ५० |
| मराठी वाचनपाठ | इ. ९ वी | -- | ६० |
| मराठी वाचनपाठ | इ. १० वी | -- | ६० |
| श्यामची आई | -- | साने गुरुजी | १० |
| करुणाष्टक | -- | व्यंकटेश माडगुळकर | १० |



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

आमचे विद्यार्थी भांडार विद्यार्थ्यांसाठी चालविले जात असल्यामुळे पुस्तकांच्या किंमतीवर आपण योग्य ती सूट द्याल अशी मी आशा करतो.

धन्यवाद, कळावे.

आपला विश्वासू,

क्ष

विद्यार्थी प्रतिनीधी

| | | |
|---|---|---|
| प्रेषक,<br>'क्ष'<br>विवेक विद्यालय,<br>सिध्दार्थ नगर, गोरेगाव<br>मुंबई - ४०० ०६२. | प्रति,<br>व्यवस्थापक,<br>आयडियल पुस्तकालय,<br>दादर, मुंबई - ४०० ०२८.<br>नागपुर | तिकीट |

**२. टिळक विद्यामंदिरमध्ये इयत्ता आठवी ब मध्ये शिकणारा अनिल रेगे चार दिवसांची रजा मंजूर करण्यासाठी वर्गशिक्षकांना विनंती करणारे पत्र लिहितो. लिफाफा आवश्यक.**

अनिल रेगे

साईनाथ सोसायटी,

विवेकानंद रोड,

खार, मुंबई -४०० ०६२.

दिनांक - १६ जानेवारी___

माननीय वर्गशिक्षक,

आठवी ब,

टिळक विद्यामंदिर,

**विषय** : चार दिवस गैरहजर राहण्याची अनुमती देण्याबाबत.

महोदय,

मी अनिल रेगे आपल्या इयत्ता आठवी ब वर्गाचा विद्यार्थी आहे. मी शाळेत नियमितपणे उपस्थित असतो.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

आमच्या गावी असणारी माझी आजी खूप आजारी आहे. तेव्हा तिला भेटण्यासाठी मला माझ्या आईवडीलांबरोबर गावी जावे लागणार आहे. त्यामुळे १८ जानेवारी ते २१ जानेवारी हे चार दिवस मी शाळेत उपस्थित राहू शकणार नाही. तरी या चार दिवसांसाठी कृपया मला रजा मंजूर करावी ही विनंती. या चार दिवसांत होणार अभ्यास मी माझ्या मित्रांच्या मदतीने पूर्ण करीन याचे आश्वासन देतो.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,

अनिल रेगे.

| | | |
|---|---|---|
| प्रेषक,<br>अनिल रेगे<br>साईनाथ सोसायटी,<br>विवेकानंद रोड,<br>खार, मुंबई -४०० ०६२. | प्रति,<br>माननीय वर्गशिक्षक,<br>आठवी ब, टिळक विद्यामंदिर,<br>रानाडे रोड, दादर,<br>मुंबई - ४०० ०२८. | तिकीट |

**३. नगरपालिका अधिकाऱ्याला तुमच्या विभागातील सार्वजनिक नळ बंद असल्याची तक्रार करणारे पत्र लिहा. लिफाफा आवश्यक.**

क्ष

पाचपाखाडी,

नौपाडा, ठाणे.

दिनांक - १० मार्च ___

मा. प्रशासन अधिकारी,

महानगर पालिका,

ठाणे.

**विषय** : सार्वजनिक नळ बंद असल्याची तक्रार.

महाशय,

मी ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील नौपाडा विभागात राहणारा रहिवासी आहे. आमच्या वसाहतीत असलेला सार्वजनिक नळ काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे येथील रहिवाशांचे फार



© SHETH Publishing House
THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

हाल होत आहेत. आम्हाला पाणी आणण्यासाठी खूप दूर जावे लागते. पाणी ही माणसांची मूलभुत गरज असल्यामुळे त्याच्याशिवाय जगणे अशक्य आहे.

तेव्हा महानगरपालिकेने या तक्रारीची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर करावी व या नळाने पाणीपुरवठा सुरु करावा ही विनंती.

तसदीबद्दल क्षमस्व! धन्यवाद

आपला विश्वासू,

क्ष.

४. तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.

सतोष माने,<br>
श्रीरंग सोसायटी,<br>
महात्मा गांधी रोड,<br>
खार, मुंबई - ४०००४२.<br>
दिनांक - ३० एप्रिल २० ___

माननीय वर्गशिक्षक,<br>
आठवी अ,<br>
विवेकानंद हायस्कूल.

**विषय :** 'हस्ताक्षर सुंदर करूया!'या शिबिरात सहभागी करून घेणेबाबत विनंती.

महोदय,

मी संतोष माने आपल्या इयत्ता आठवी अ वर्गाचा विद्यार्थी आहे. पत्र लिहिण्यास कारण की, आपल्या शाळेत मे महिन्यात १० दिवसांचे हस्ताक्षर सुंदर करूया! या शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिर २ मे ते ११ मे या कालावधीत आहे.

मला माझ्या हस्ताक्षरात सुधारणा करायची आहे. शिबिरात मी गैरहजर राहणार नाही. व मी माझे हस्ताक्षर सुंदर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीन. आपण मला शिबिरात सहभागी करून घ्यावे ही विनंती.

तसदीबद्दल क्षमस्व!

आपला नम्र विद्यार्थी,<br>
संतोष माने.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## अनौपचारिक पत्र

**१. सुरेश / सुरुची भट, मधुगंधास टिळक मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०० ०५९ येथून आपला मित्र संपत / आपली मैत्रिण संपदा पाटील, १, सुजीवन, नेहरु मार्ग, नागपूर, येथे त्याला / तिला आंतरशालेय चित्रकलेच्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहितो/ लिहिते. पत्राचा नमुना तयार करा. लिफाफा काढणे आवश्यक.**

सुरुची भट
२, मधुगंधा, टिळक मार्ग,
अंधेरी (पूर्व),
मुंबई - ४०००२१
दिनांक - २५ जानेवारी २०

प्रिय संपदा,

स.न.वि.वि.

आजचे वर्तमानपत्र उघडले आणि वाचताना कला विभागात तुझा फोटो छापलेला पाहिला. म्हणून उत्सुकतेने वाचू लागले. तेव्हा तुला आंतरशालेय चित्रकलेच्या स्पर्धेत पाहिले पारितोषिक मिळाल्याचे कळले. हार्दिक अभिनंदन !

लहानपणापासून तु चित्रे फार सुंदर काढायचीस. तुझी चित्रे नेहमी शाळेच्या नोटीसबोर्डावर लावलेली असत. ही बातमी वाचून मला तर इतका आनंद झाला की प्रत्येकाला मी ही बातमी सांगत सुटले. आम्ही घरी पेढे आणून सर्वांचे तोंड गोड केले. तु सतत केलेल्या सरावाचे व कष्टाचे तुला चांगले फळ मिळाले. उत्तरोत्तर तुला असेच सुयश लाभो व जागतिक कीर्तीची कलाकार म्हणून नाव मिळो हीच सदिच्छा!

ती. स्व. काकांना व ती.स्व. काकूंना सा.न. छोट्या समीरला अ. आ. कळावे.

तुझी प्रिय मैत्रिण,

सुरुची

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ३ बातमी लेखन

❖ वृत्तपत्रे, दुरदर्शन, रेडिओ, भ्रमणध्वनी, संगणक यासारख्या माध्यमाद्वारे देश-विदेशातील घडामोडी आपल्यापर्यंत पोहचत असतात. भूतकाळ, वर्तमानकाळ व काही वेळा भविष्यकाळातील घटनांची अचूक माहिती जनतेला कळते. **'बातमी लेखन'** यात कल्पनेला वाव नसतो. जे समोर दिसते, घडते त्याचेच वर्णन जसेच्या तसे येथे केलेले असते. बातम्या सुटसुटीत व आकर्षक पद्धतीने लिहिणे ही एक कला आहे. वाचकांचे लक्ष वेधण्यासाठी बातम्यांचा मथळा (शीर्षक) आकर्षक असावा. बातमीमध्ये स्थळ, काळासोबतच महत्वाच्या मुद्द्यांवर अधिक भर द्यावा. किरकोळ गोष्टीचा उल्लेख नाममात्र असावा.

## १. खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

**दिनांक - ८ मे**

### 'चला, शास्त्रशुध्द लिहू या'

**मुंबई**: कांदिवली येथील 'मंथन विद्यामंदीर' येथे दिनांक ३ मे पासून 'एडिट मित्र'या संस्थेतर्फे पाच दिवसीय शुध्दलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत इयत्ता ८ वी ते १० वी च्या एकूण २३५ विद्यार्थ्यांनी व काही पालकांनी सहभाग घेतला होता.

प्रा. अरुण फडके यांनी आपल्या उत्तम मार्गदर्शनाने विद्यार्थीनींच्या व पालकांच्या मनातील शंका दूर केल्या. मराठी शुद्धलेखनाचे नियम, वाक्यरचना, व्याकरण, तत्सम व तद्भव शब्द हे सर्व त्यांनी सोप्या पद्धतीने शिकविले. शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यात खूप छान बौध्दिक चर्चा रंगली कार्यशाळेच्या शेवटी विद्यार्थांनी शुध्दलेखनातील एक एक मजकूर लिहून दाखविला. कार्यशाळा विद्यार्थी व पालक यांना फारच उपयुक्त वाटली. शाळेचे मुख्याध्यापक श्री. अनिल परब यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

© SHETH Publishing House

### प्र.१ कोण ते लिहा.

अ) कार्यशाळा घेणारे शिक्षक - ______________

आ) सहभाग घेणारे - ______________

इ) कार्यशाळेचे आयोजक - ______________

ई) शाळेचे मुख्याध्यापक - ______________



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**प्र.२ उत्तरे लिहा.**


अ) विद्यार्थ्यांची व पालकांची संख्या - ____________________

आ) कार्यशाळेचे ठिकाण - ____________________

इ) कार्यशाळा संपली ती तारीख - ____________________

ई) कार्यशाळेत या विषयाचे शुध्दलेखन शिकविले - ____________________

**प्र.३** **कार्यशाळेत शिकवलेले घटक**



**२. खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**दिनांक - १२ डिसेंबर**

## ‘क्रीडा महोत्सवाची सांगता’

**मालाड** : कांदिवली येथील ‘नूतन विद्यामंदिर’ मालाड (प.) या शाळेच्या क्रीडा महोत्सवाचा समारोप दिनांक ११ डिसेंबर या दिवशी गोरेगाव येथील ‘प्रबोधन क्रीडांगणावर’ पार पडला.

समारोपाच्या आदल्या दिवशी विविध स्पर्धा शाळेच्या पटांगणावरच घेण्यात आल्या. ज्यात मोठ्या वयोगटातील मुला-मुलींसाठी १०० मी धावण्याची शर्यत, तीन पायांची शर्यत तर छोट्या गटातील मुला-मुलींसाठी चमचा-लिंबू ह्या शर्यतींचा समावेश होता. ‘गोळा फेक’ ही स्पर्धा फक्त मोठ्या वयोगटातील मुलांसाठीच होती. ‘४०० मी रिले रेस’ ही स्पर्धा समारोपाच्या दिवशी घेण्यात आली.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे नगरसेवक श्री. तुषार पटेल यांनी केले. त्यांच्याच हस्ते विजेत्यांना सुवर्ण पदक, रौप्य पदक, कांस्य पदक व प्रमाणपत्रे देण्यात आली. शाळेच्या क्रीडा प्रतिनिधी मनोज बागवे याने सर्वाधिक पदके पटकविली. शाळेचे मुख्याध्यापक व क्रीडा महोत्सवाचे अध्यक्ष श्री. कौस्तुभ अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**प्र.१ उत्तरे लिहा.**

अ) सोहळ्याचे ठिकाण - ________________

आ) कार्यक्रमाचे उद्घाटक - ________________

इ) कार्यक्रमाचे अध्यक्ष - ________________


ई) शाळेत घेण्यात आलेल्या स्पर्धेची तारीख - ________________

उ) फक्त मुलांसाठीच असलेल्या स्पर्धेचे नाव - ________________

ऊ) समारोपाच्या दिवशी झालेली स्पर्धा - ________________

ए) सर्वात जास्त पदके मिळवणारी व्यक्ती - ________________

**प्र.२** **विजेत्यांना मिळालेली बक्षीसे**



© SHETH Publishing House

**३. खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

## ‘बातमीलेखन (Fifa World cup)’

फिफा वर्ल्डकप मध्ये दक्षिण अमेरीकी संघाला हरवणारा जपान हा पहिला आशियाई संघ ठरला आहे. जपानने कोलंबियावर २-१ अशी मात करुन, रशियातल्या वर्ल्डकप मध्ये विजयी सलामी दिली.

कोलंबियाने गेल्या वर्ल्डकप मध्ये जपानचा ४-१ असा धुव्वा उडवला होता. शिन्जी कागावानं सहाव्या मिनिटांला पेनल्टीवर गोल करुन जपानचं खातं उघडल. बचावपटू कार्लोस सांचेझला लाल कार्ड मिळाल्यानं कोलंबियाला या सामन्यात ८६ मिनिटं दहा खेळाडूंना खेळावं लागलं.

**प्र.१ उत्तरे लिहा.**

अ) दक्षिण अमेरीकी संघाला याने हरवलं - ________________

आ) जपानने कोलंबियावर इतकी मात केली - ________________

इ) वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन इथे झाले - ________________

ई) जपानसाठी पहिला गोल याने केला - ________________



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ४ संवाद

❖ एखाद्या निश्चित विषयावर जे संभाषण चालते त्याला **'संवाद'** असे म्हणतात. अशा प्रकारचे संभाषण लिहून दाखविणे याला **'संवाद लेखन'** असे म्हणतात.

❖ **संवादलेखन कसे असावे?**

❖ संवादलेखनातील भाषा ती बोलणाऱ्या व्यक्तींच्या तोंडी शोभेल अशी असावी.

❖ संवादातील वाक्ये लांबलचक असू नयेत. ती छोटी, सुटसुटीत, मुद्देसूद असावीत.

❖ संवाद लेखनात केवळ प्रश्नोत्तरे नसावीत, तर चटकदार संवाद, उद्गारार्थी वाक्ये, ओघावती भाषा असावी.

**१) निसर्गातील कोणत्याही पाच गोष्टींपासून माणसाला काय काय शिकता येईल याविषयी तुम्ही व तुमच्या मित्रांमध्ये झालेला संवाद लिहा.**

**मी** - अरे, अतुल! कवी नितीन देशमुख यांची कविता वाचलीस का?

**अतुल** - कोणती? ती 'जीवन गाणे' ही कवीता का?

**मी** - हो ना! किती सुंदर कविता आहे ती! निसर्गातील विविध घटकांपासून माणसाने काय शिकले पाहिजे याचे सुंदर वर्णन कवीने कवितेत केले आहे.

**अतुल** - अरे निसर्ग आहेच सुंदर असा! त्याच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे.

**मी** - निसर्गातील घटकांपासून आपण काय बोध घ्यावा? सांग.

**अतुल** - आता झाडाचेच उदाहरण बघ. तुझ्या घराच्या बागेत तू किती सुंदर फुलझाडे लावली आहेस. ती तुझ्या घराची शोभा तर वाढवतातच पण अशी अनेक झाडे आहेत ती अपल्याला उपयोगी आहेत.

**मी** - हो! अगदी बरोबर! झाडांचा प्रत्येक अवयव उपयुक्त आहे. म्हणूनच झाडाला 'परोपकारी मित्र' असे म्हणतात.

**अतुल** - हो मी दर सुट्टीत जातो.

**मी** - मी ही सुट्टीत गावाला जातो. नदीत मनसोक्त डुंबतो तुला माहितेय नदीचे झुळझुळ, खळखळणारे वाहते पाणी आपल्यात काय संदेश देते ते?

**अतुल** - तूच सांग.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**मी** - नदी आपल्याला सतत पुढे जाण्याचा संदेश देते. गावाला जाताना मला सह्याद्री पर्वताचे दर्शन होते. पर्वत सुद्धा आपल्याला कणखरपणाचा संदेश देतात. कोणत्याही बिकट परिस्थितीत घट्ट पाय रोवून उभे कसे राहायचे ते शिकवतात.

**अतुल** - आकाशातील चंद्र सूर्य यांच्याकडून आपण वेळेचे महत्त्व वक्तशीरपणा शिकायला पाहिजे. चंद्र सूर्य जर का वेळेवर उगवलेच नाहीत पर काय अनर्थ होईल याची कल्पनाच न केलेली बरी.

**मी** - या शिवाय पाऊस, वारा, काळी आई (धरतीमाता) हे सुद्धा आपल्याला काही ना काही मूल्ये व संस्कार शिकवतात. मुख्य म्हणजे सतत पुढे जात राहणे हे निसर्ग आपल्याला शिकवतो. आपण निसर्गाचे रक्षण करायला पाहिजे.

**अतुल** - माझे सुद्धा हेच मत आहे. तशी आपण शपथच घेऊया कि यापुढे आपण नैसर्गिक संपत्तीचे जतन करु.

**२) दिवसेंदिवस पाण्याची समस्या गंभीर होत चालली आहे. प्रत्येकजण पावसाची चातकासारखी वाट बघत आहेत. त्यातही शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यासंबंधी शेतकरी व तुमच्यात झालेला संवाद लिहा-**

**मी** - राम राम शेतकरी दादा!

**शेतकरी** - राम राम भाऊ!

**मी** - कसं काय चांललयं?

**शेतकरी** - चाललय कसंतरी हळूहळू. गेल्या दोन-तीन वर्षापासून पाऊस नाही. काय करणार? कधी पाऊस कमी म्हणून नुकसान तर कधी जास्त म्हणून नुकसान. गरीबी तर आमच्या पाचवीलाच पुजलेली. तुमच्या सारख्या शहरात राहणाऱ्या माणसांना आमचं दु:ख काय कळणार!

**मी** - तसं नाही दादा. तुमचं दु:ख आम्हाला कळतय. तुमच्यावर ओढावलेल्या परिस्थितीला कुठंतरी आम्हीही कारणीभूत आहोत. आम्ही शहरी माणसं वृक्षतोड करतो. नवीन झाडे लावत नाहीत. जंगलं तर आता नष्ट होऊन सिमेंटची जंगलं उभारली जात आहेत. जमिनीची धूप होत आहे. अशाने पर्यावरणाचा नाश व मनुष्याचा विनाश, तो स्वत:वर ओढवून घेत आहे. हे त्याला कळत नाही.

**शेतकरी** - हो भाऊ! साध्या साध्या गोष्टी जरी आपण पाळल्या तर आज आपला देश परत सुजलाम, सुफलाम् व्हायला वेळ लागणार नाही.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**मी** -काय आहे दादा! माणसांना कळतं पण वळत नाही. आता कुठं कुठं या विषयावर जनजागृती व्हायला लागलीय. लोक आता पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरत आहेत. काही सामाजिक संस्था व माणसे यांनी वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. काही गावात गावकरी श्रमदानातून नदीच्या पात्राचे रुंदीकरण करत आहेत. नवीन विहीरी, तलाव यांचे काम सुरु आहे. नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांची 'नाम' ही संस्था शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी आहे.

**शेतकरी** -अगदी बरोबर बोललात तुम्ही भाऊ. शेतकऱ्यांच्या पाठीशी आज अनेक लोक, संस्था आहेत.

### ३) नदी व झाड यांच्यातील संवाद लिहा.

**झाड** - का ग सरिता, तुझा वेग का असा मंदावला?

**नदी** - अंग काय सांगू तुला ! या मानवाच्या वाईट सवयींमुळे माझी अशी अवस्था झाली आहे.

**झाड** - पूर्वी तुझ्या डोहात स्वच्छ पाणी असायचं. तू खळखळ वाहायचीस. तू सर्वांच्या उपयोगी पडायचीस अगदी माझ्यासुध्दा.

**नदी** - हो ना.

**झाड** - मी केवळ तुझ्यामुळे या काठावर दिमाखात उभा आहे. माझ्यासारखे इतर लहान -मोठे वृक्ष आज तग धरुन डौलाने उभे आहेत ते फक्त तुझ्याच मुळे.

**नदी** - मला तुम्हा सर्वांना अशीच शेवटपर्यंत साथ द्यायची आहे. पण माझं पाणी हळूहळू आत दूषित होऊ लागलं आहे.

**झाड** - ते कशामुळे?

**नदी** - अग लोक माझ्या पाण्यात कपडे, जनावरे, धुऊ लागले आहेत. कचरा, निर्माल्य, सांडपाणी माझ्या प्रवाहात फेकायला लागलेत.त्यामुळे माझ्या प्रवाहात अनेक अडथळे येऊ लागले आहेत. एका जागी राहून आता शेवाळही साचू लागले आहे.

**झाड** - दैव देत आणि कर्म नेत असंच मानवाच्या बाबतीत म्हणता येईल. माझीही अवस्था या मानवामुळे अशीच होईल काही सांगता येत  नाही.

**नदी** - या मानवाला कधी शाहणपण येईल देवास ठाऊक.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ५ सारांश लेखन

## १) खालील अपठित गद्य उताऱ्याचा सारांश लिहा.

एके दिवशी कलाम चर्चमध्ये आपल्या टेबलापाशी बसून काम करत असताना त्यांना अंतराळ विभागातील एका उच्च अधिकाऱ्याकडून अनपेक्षित फोन आला. जेव्हा कलाम त्या अधिकाऱ्याबरोबर बोलले, तेव्हा त्याने कलाम यांना एक शुभवार्ता ऐकविली की डॉ. विक्रम साराभाई यांनी त्यांची व काही अन्य भारतीय वैज्ञानिकांची साऊंडिंग रॉकेटविषयी सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाकरता अमेरिकेतील 'नासा' या संस्थेत जाण्यासाठी निवड केली आहे. अमेरिकेला जाण्यापूर्वी काही दिवस आपल्या कुटुंबासमवेत राहण्याकरिता कलाम रामेश्वरला गेले. त्यांच्या घरातील प्रत्येक व्यक्तीला कलाम यांची 'नासा' कार्यक्रमासाठी निवड झाली, याचा अभिमान वाटत होता. ज्या दिवशी ते न्यूयॉर्कला जाण्यासाठी मुंबईमध्ये विमानात बसण्यासाठी निघणार होते, त्या दिवशी घरातले वातावरण भावूक झाले होते. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना आशीर्वाद दिला. मित्रांनी त्यांना अधून मधून पत्र पाठवत राहायला सांगितले.

**सारांश -** डॉ. विक्रम साराभाई यांनी कलाम व काही भारतीय वैज्ञानिकांची 'नासाच्या' साउंडिंग रॉकेटविषयी प्रशिक्षणाकरता निवड केली. ही शुभवार्ता अंतराळ विभागातील उच्च अधिकाऱ्याकडून कलाम यांना कळली. अमेरिकेला जाण्यापूर्वी कलाम रामेश्वरला गेले. तेथे आई-वडिलांनी त्यांना आशीर्वाद दिला. मित्रांनी पत्र पाठवण्यास सांगितले.

## २) खालील अपठित गद्य उताऱ्याचा सारांश लिहा.

'काम करा काम, घाम गाळा घाम' हा विकासासाठी आवश्यक असलेला घोषमंत्र आहे. कामासाठी दुसऱ्याकडे बोट दाखवायचे आणि आराम स्वत:साठी राखून ठेवायचा अशी पोशाखी, आळशी, परावलंबी वृत्ती अनेकांची दिसून येते. माणसातील चिकाटी, बिनचूकपणा, कष्टाळूपणा श्रमदानातून समजतो. कष्टकरी समाज राबत असतो आणि त्याच्या श्रमांवर अनेकजण मजेत राहतात. आधी काम मग थोडासा आराम हे प्रत्येकाने स्वत:ला बजावत मनापासून काम करायला हवे. श्रमदानाच्या वेळी बुद्धिजीवींना आपल्या उणिवा कळतात आणि श्रमजीवींचे महत्व कळते. 'आराम हराम है' हे पंडितजींचे वाक्य लक्षात ठेऊन आळस झटकून, काम करा काम, घाम गाळा घाम असे म्हणत कामाला लागा.

**सारांश -** 'काम करा काम, घाम गाळा घाम' व 'आराम हराम है' हे घोषमंत्र लक्षात ठेवा. काही लोक दुसऱ्यांवर काम टाकून व कष्टकऱ्यांच्या श्रमांवर मजेत राहतात. श्रमदानातून माणसाला त्याचे अंगभूत गुण आणि उणिवा कळतात.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

३) खालील उतारा वाचा. त्याचा तुम्हांला समजलेल्या अर्थ सारांश रूपाने पुन्हा लिहा.

आपल्यासारख्या सामान्यांना शब्दावाचूनचे संवाद भावणारंही नाहीत, की परवडणारही नाहीत. आपल्याला कठीण, साधे, सरळ, वक्र कसे का होईना; पण बोलणे आणि ठणठणीत बोलणेच हवे असते आणि या बोलण्याचे किती अनंत प्रकार असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्या चालीवर 'माणसे तितकी बोलणी' अशी म्हण बनवायला हरकत नाही. 'मोकळा संवाद' असे आपण म्हणतो; पण समाजात वावरताना या तथाकथित मोकळ्या संवादावर कशी आणि किती बंधने पडत असतात ते पाहिले म्हणजे गंमत वाटते. मित्रमंडळींशी गप्पा मारताना खूप मुक्त, मोकळे असतो अशी आपली समजूत असते; पण ती खरी असते का? आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष, एकमेकांच्या जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात; त्यामुळे तिथे कधी मोकळ्या गप्पा होत असल्या, तरी अनेकदा नात्यातल्या जवळिकीमुळेच कधी कधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. एकमेकांची मते, आग्रह, दुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे बोलतांना त्यांना कुठे धक्का लागणार नाही, समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते.

**सारांश** - सामान्य माणसांना मात्र ठणठणीत बोलणेच हवे असते. जितकी विविध माणसे तितक्या त्यांच्या वैवीध्यपूर्ण बोलण्याच्या पद्धती.

मित्रमंडली, जवळच्या माणसांमधील गुणदोष, बरेवाईट तपशील, स्वाभिमानाची ठिकाणे, हळवी वृत्ती या बाबी लक्षात ठेवल्यामुळे त्यांच्याशी मोकळा संवाद होत नाही.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## स्वाध्याय

### १. खालील अपठित गद्य उताऱ्याचा सारांश लिहा.

'प्रेम करा, प्रेम करा', म्हणून जगात एकसारखा उपदेश चाललेला दिसतो. प्रेम केल्याने आपला आनंद वाढतो. आपण सुखी होतो, हेही खोटे नाही. पण प्रेम करायचे म्हणजे वाटते तितके सेपे नाही. जो आवडत नाही त्याच्यावर प्रेम करता येत नाही. आपली आवड-नावड बहुतेक वेळा आपल्या स्वार्थावर अवलंबून असते. आपले ऐकेल तो आपला आवडता, आपले ऐकत नाही तो नावडता, असा साधारणपणे माणसाचा स्वभाव असतो. म्हणून 'प्रेम करा' म्हटल्याने प्रेम करणे साधणार नाही. आपण स्वार्थाच्या दृष्टीने दुसऱ्याकडे पाहण्याची ही सवय कमी केली पाहिजे. आपल्या स्वार्थाऐवजी समोरच्या माणसाच्या गुणांवर दृष्टी ठेवण्याचे आपण आपल्या मनाला वळण लावले पाहिजे. आपल्या संगतीत आलेल्या प्रत्येकाचे गुण पाहावयास शिकावे, जो गुण दिसतो त्याचे कौतुक करावे म्हणजे प्रेम वाढत जाते. दुसऱ्याबद्दल आदरभाव वाढल्या खिरीज प्रेम निर्माण होणे कठीण आहे. हे आपण ध्यानात ठेवावे.

उत्तर

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ६ जाहिरात लेखन

१) खालील जाहिरात वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

## संगणक क्लासची जाहिरात



**सवलतीच्या दरात संगणक शिकण्याची संधी**

- हप्त्याने पैसे भरण्याची सोय
- तज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन
- इंग्रजी व मराठीतून शिक्षण
- ९०% व्यवसाय व नोकरीची संधी

**संपूर्ण कोर्स ३ महिने. वेळ ८ ते ११**

जागा शिल्लक फक्त २५. जागा संपण्याआधी आज प्रत्यक्ष भेटा.

वयाची अट नाही! बेकारांनो निराश होऊ नका!

**अनुभवाचे बोल - श्रीमती माया परांजपे**
संजीवन क्लासेसमुळे माझ्या मुलाला नोकरी लागली.
कालच त्याने पहिला पगार मला दिला.

**आमचा पत्ता** - संजीवन क्लासेस, स्टेशन रोड, माहिम, मुंबई. दूरध्वनी - २४८७ ०२०४

प्र.१ उत्तरे लिहा.

अ) जाहिरात देणारे - ______

आ) कोर्सचा कालावधी - ______

इ) क्लासची वेळ - ______

ई) एकूण शिल्लक जागा - ______

उ) जाहिरातीचा विषय - ______

ऊ) संपर्काचे साधन - ______

ए) क्लास या शहरात व उपनगरात आहे - ______

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

प्र. २ श्रीमती माया परांजपे यांना संजीवन क्लासचा काय अनुभव आला?

उत्तर ______________________________

______________________________

______________________________

प्र. ३ संजीवन क्लासची वैशिष्टये

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

२) खालील जाहिरात वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

इंग्रजी संभाषण वर्ग




रमाबाई - शाळेत मुलाच्या पालक सभेसाठी गेल्या. शाळेतल्या बाई फाडफाड इंग्रजी बोलत होत्या. मला तर बाई समजायला त्रास झाला.

**रमाबाई निराश का होता?**

खास गृहिणींसाठी व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी
फाडफाड इंग्रजी बोलण्यासाठी आठवले विद्यालयात खास वर्ग

# कोकाटे इंग्रजी संभाषण वर्ग

**उन्हाळ्याची सुट्टी वाया घालवू नका.**

कमी पैशात म्हणजे फक्त **५०० रु.** इंग्रजी संभाषण कला शिका.

वेळ - १० ते १

**संपर्कासाठी पत्ता:** आठवले गुरुजी विद्यालय, कोकाटे संभाषण वर्ग, अदालत रोड, औरंगाबाद.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

प्र.१ उत्तरे लिहा.

अ) संभाषणाचे या शाळेत खास वर्ग - ____________________

आ) संभाषणाचे वर्ग या दिवशी - ____________________

इ) जाहिरात करणारे - ____________________

ई) कशाची जाहिरात - ____________________

उ) संभाषण वर्ग कोणत्या शहरात? - ____________________

प्र.२ कोकाटे इंग्रजी संभाषण वर्ग यांच्यासाठी

प्र.३ रमाबाई निराश का होत्या?

उत्तर ____________________

____________________

____________________

प्र.४ कोकाटे इंग्रजी संभाषण वर्ग

- या वेळेत
- फी

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ७ सूचना फलक

१) विषय : 'बालविकास' शाळेचे सांस्कृतिक कार्यक्रमंचे आयोजन.

## सूचनाफलक

दि. २२ डिसेंबर ____

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दि. २३ डिसेंबर रोजी '**बालविकास**' शाळे तर्फे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यांत विविध वयोगटातील विद्यार्थी नृत्य, गायन व कला सादर करणार आहेत. पालकांनी या कार्यक्रमास हजर राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

**वेळ** : सायंकाळी ६.०० ते ९.०० पर्यंत

**ठिकाण** : शाळेचे पटांगण.

२) विषय : रहदारी संबंधी सूचना.

## सूचनाफलक

दि. २४ मे ____

सिद्धार्थ नगर गोरेगाव (प) येथील एस.एस. शंकर मार्ग हा रस्ता सिमेंट चा करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे नागरिकांना कळवण्यात येते की, त्यांनी हा रस्ता रहदारी साठी वापरु नये. त्याऐवजी पर्यायी रस्त्याचा अवलंब करावा. नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

मुंबई महानगरपालिका
रस्ते विभाग

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

३) विषय : सहली संदर्भात सूचना.

## सूचनाफलक

दि. १ एप्रिल ____

मार्डन टूर अँड ट्रॅवल्स तर्फे १५ दिवसांची कुलू - मनाली येथे दिनांक १० मे ते २४ मे या कालावधित आंबेडकर नगर रहिवासींसाठी खास सहल आयोजित करण्यात येत आहे. इच्छूकांनी या संधीचा लाभ घ्यावा व सोसायटीच्या कार्यालयात येऊन ३० एप्रिल पर्यंत आपली नोंदणी करावी.

प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल.

सेक्रेटरी

आंबेडकरनगर रहिवासी संघ

## स्वाध्याय

१. विषय : तुमच्या शाळेत बालदिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्यासाठी एक सूचना फलक तयार करा.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# अभ्यास - उत्तरे

## विभाग १ - व्याकरण

### २. नाम

**प्र.१ खालील वाक्यातील नामे ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

१) आनंद - भाववाचक नाम २) संघाची - सामान्य नाम ३) मोठेपणा - धातुसाधित नाम ४) सागर - विशेषनाम ५) ताजमहालाचे - विशेषनाम

**प्र.२ पुढील शब्दांना प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार करा व ती वाक्यात वापरा.**

१) शांतता - वाचनालयात शांतता हवी.

२) श्रीमंती - मनाची श्रीमंती अधिक महत्वाची.

३) नवलाई - लहान वयात असणाऱ्या हूशारीची तिला नवलाई वाटली.

४) मधुरता - आपल्या बोलण्यात मधुरता असावी.

५) मैत्री - आयुष्यभर जपलेली मैत्री म्हणजे जणू सोनंच!

६) प्रामाणिकपणा - प्रामाणिकपणा गरजेचा असतो.

७) सावधगिरी - रात्री सावधगिरीने प्रवास करावा.

८) माणूसकी - प्राण्यांना सुद्धा माणूसकी असते.

९) गोडवा - तिच्या आवाजात गोडवा आहे.

**प्र.३ पुढील धातूंना प्रत्यय लावून धातुसाधित नामे तयार करा व ती वाक्यात वापरा.**

१) वाचणे - कमी प्रकाशात वाचणे डोळ्यांसाठी चांगले नसते.

२) रडू - कुत्र्याचा झालेला अपघात पाहून सानिकाला रडू आले.

३) धावणे - धावणे हा सर्वोत्तम व्यायाम आहे.

४) उगवते - नीता आपल्या बागेत वेगवेगळी फुले उगवते व त्यांची काळजी घेते.

५) गाऊ - चला! सारे मिळून गाणी गाऊ.

**प्र.४ खालील तक्ता पूर्ण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) गांभीर्य | २) तरुण | ३) धैर्य | ४) मनुष्यत्व | ५) मित्र | ६) प्रौढत्व |
| ७) शत्रुत्व | ८ मोठेपणा | ९) देव | १०) बालपण | ११) प्रामाणिकपणा | १२) वकिली |
| १३) लबाडी | १४) सुदैवी | १५) उद्योगी | १६) गरीब | १७) गोडी | १८) समता |
| १९) भव्यता | २०) धार्मिक | २१) क्रूर | २२) नम्रता | २३) गावकी | २४) भिक्षा |
| २५) माणुसकी | २६) पाटीलकी | २७) लुच्चेगिरी | २८) फसवा | २९) कामगिरी | ३०) गुलाम |
| ३१) गारवा | ३२) दूरावा | ३३) ओला | ३४) गोडवा | ३५) नवलाई | ३६) दांडगाई |
| ३७) चपळाई | | | | | |



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ३. सर्वनाम

**प्र.१ खालील वाक्यातील सर्वनाम व त्यांचे प्रकार ओळखून लिहा.**

१) तो - पुरुषवाचक २) मला - आत्मवाचक ३) हे - दर्शक ४) आपण - आत्मवाचक
५) जया, तया - संबंधी ६) कोणी सामान्य किंवा अनिश्चित ७) त्या - दर्शक
८) त्या - दर्शक ९) जो, तो - संबंधी १०) तू - पुरुषवाचक

## ४. विशेषण

**प्र.१ खालील वाक्यातील विशेषण ओळखा.**

१) नवीन २) लाल ३) दहा ४) आंबट ५) तिसरा
६) हिरवीगार ७) देवळाजवळ ८) चालत्या ९) नऊ १०) घरासमोर
११) पुढच्या १२) बनारसी १३) कोल्हापूरी १४) फार १५) तुडुंब
१६) मागील १७) बोलकी १८) हा १९) सहा २०) दुहेरी

## ५. क्रियापद

**प्र.१ पुढील वाक्यात क्रियापदे घालून ती वाक्ये पूर्ण करा.**

१) आहे २) लिहीला ३) आले ४) असावे ५) म्हटले
६) मिळाली ७) नाहीत ८) पडले आहे ९) झोपले आहे १०) गातात
११) शिकवतात १२) फिरत होत्या १३) काढत होते १४) सजला १५) दिले

**प्र.२ खालील वाक्यातील क्रियापदे ओळखून लिहा.**

१) पोहोचला २) हसू लागले ३) आला नाही ४) ओरडले ५) नाहीत
६) हबकला ७) केली ८) लागली ९) पडला १०) करीत आहेत
११) टाकला १२) दिला १३) मारली १४) होता १५) आवडायची

## ६. अव्यय आणि त्यांचे प्रकार

### १) क्रियाविशेषण अव्यय

**प्र.१ खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यये ओळखा.**

१) मंजूळ २) झुळझूळ ३) एकाएकी ४) जिकडे तिकडे ५) अद्याप
६) सगळीकडे ७) आनंदाने ८) प्रसन्नपणे ९) सावकाश १०) संध्याकाळी
११) इतक्यात १२) सकाळीच १३) भरभर १४) सावकाश १५) आज
१६) लगबगीने १७) अखेर १८) अजून १९) खळखळ २०) जोमाने

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

**प्र.२ रिकाम्या जागी कंसात दिलेली योग्य ती क्रियाविशेषणे घालून वाक्ये लिहा.**

१) आज २) उशीरा ३) उद्या ४) पुढे ५) मटकन ६) जोराने ७) पटापट

**प्र.३ खालील वाक्यात योग्य ती क्रियाविशेषण अव्यये लिहा.**

१) मागे २) सावकाश ३) आजूबाजूला ४) जोरात ५) रोज
६) लवकर ७) सर्वत्र ८) फार ९) हळूहळू १०) जोमाने

## २) शब्दयोगी अव्यय

**प्र.१ खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यये ओळखून लिहा.**

१) वर २) साठी ३) कडे ४) मध्ये ५) भोवती
६) साठी ७) आड ८) पर्यंत ९) वर १०) कडे
११) मध्ये १२) देखील १३) मागे १४) च १५) ही
१६) आडून १७) वरून १८) कडे १९) समोर २०) सारखे

**प्र.२ खालील वाक्यात रिकाम्या जागी शब्दयोगी अव्यये घालून ती पुन्हा लिहा.**

१) वर २) अभ्यासात ३) पासून, पर्यंत ४) खाली ५) समोर
६) पुढे ७) सोबत ८) करिता ९) साठी १०) कडे
११) प्रमाणे १२) पासून १३) समोर १४) वर १५) पूढे
१६) आडून १७) कडे १८) समोर १९) भर २०) सोबत

## ३) उभयान्वयी अव्यय

**प्र.१ खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यये ओळखून लिहा.**

१) किंवा २) तर ३) व ४) व ५) नि ६) आणि ७) पण
८) तेव्हा ९) पण १०) आणि ११) नि १२) तर १३) व १४) की
१५) अन् १६) तो १७) आणि १८) परंतु १९) म्हणून २०) तर २१) पण
२२) की २३) तरीही २४) म्हणून २५) किंवा

**प्र.२ पुढील वाक्यात उभयान्वयी अव्यये घाला.**

१) आणि २) मग ३) तर ४) म्हणून ५) पण
६) तरीही ७) की ८) व ९) आणि १०) नि

**प्र.३ खाली दिलेल्या उभयान्वयी अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१) सोनालीने छान गुण मिळवले, म्हणून बाईंनी तिचे कौतुक केले.
२) ती माझ्याकडे आली, कारण तिला पैसे हवे होते.
३) मी तिला सांगितले की, आपण संध्याकाळी फिरायला जाऊ.
४) जनतेची सेवा करा, म्हणजे ते तुम्हाला मत देतील.
५) पूर्वी डॉक्टर अथवा इंजिनिअर यातच मुले निवड करायची.



©SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

६) वैद्याने चांगले औषध दिले, पण उपयोग झाला नाही.
७) आपण मेहनत करावी, बाकी यश मिळणे देवाच्या हातात असते.
८) प्रयत्न केला तर यश मिळणारंच.
९) तू आलास तेव्हा मी बाहेर गेलो होतो.
१०) भरपूर खाऊन सुद्धा बाळाला आणखी भूक होती.
११) खरे नि खोटे या नाण्याच्या दोन बाजु आहेत.
१२) रजनी व रेखा सिनेमा पहायला गेल्या.

## ४) केवलप्रयोगी अव्यय

**प्र.१ पुढील वाक्ये वाचा व त्यात कोणती केवलप्रयोगी अव्यये आहेत ते लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) शाबास! | २) छे! | ३) अबब ! | ४) हां ! | ५) अँ! |
| ६) हं ! | ७) आई गं ! | ८) छे ! | ९) हॅट! | १०) छान! |
| ११) ओहो! | १२) अहाहा! | १३) शाबास ! | १४) गप ! | १५) चुप! |
| १६) ठिक ! | १७) ओ ! | १८) बाप रे ! | १९) छे ! | २०) अरेरे ! |

**प्र.२ पुढील वाक्यात योग्य ती केवलप्रयोगी अव्यये लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) अरे वा! | २) अरेरे! | ३) आहा! | ४) अरे! | ५) वा! |
| ६) गप्! | ७) वा! | ८) अहो! | ९) वाहवा! | १०) आई गं! |

**प्र.३ खालील वाक्यातील अव्यये ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

१) वरून - शब्दयोगी अव्यय
२) बोटभर - क्रियाविशेषण अव्यय
३) छे! छे! - केवलप्रयोगी अव्यय
४) वर - क्रियाविशेषण अव्यय
५) पांढऱ्याशुभ - क्रियाविशेषण अव्यय
६) नि - उभयान्वयी अव्यय
७) पाशी - शब्दयोगी अव्यय
८) अरे ! - केवलप्रयोगी अव्यय
९) वरून - शब्दयोगी अव्यय
१०) व - उभयान्वयी अव्यय
११) वरच्या - शब्दयोगी अव्यय
१२) पण - उभयान्वयी अव्यय
१३) की-उभयान्वयी अव्यय
१४) च्या-शब्दयोगी अव्यय
१५) रात्री-क्रियाविशेषण अव्यय

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

# ७. वाक्यांचे प्रकार

## २) मिश्र वाक्य

**प्र.१ खालील वाक्यातील मुख्य वाक्य व गौण वाक्य ओळखून रकान्यात भरा.**

| | मुख्य वाक्य | गौण वाक्य |
|---|---|---|
| १) | जेव्हा मला वाटेल | तेव्हा मी चित्र काढेन. |
| २) | जे चकाकते | ते सोने नसते. |
| ३) | मी विचार केला | की गावाला जाईन व शेती करेन. |
| ४) | गुरुजी म्हणाले | की प्रत्येकाने स्पर्धेत भाग घ्यावा. |
| ५) | दिवाळी आली | की आम्ही आकाशकंदिल बनवणार. |

## ३) संयुक्त वाक्य

**प्र.१ खाली दिलेल्या वाक्यात संयुक्त वाक्ये लिहून विधाने पूर्ण करा.**

१) सायन्स घेईन.
२) ती हुशार आहेत.
३) घरी पुस्तक वाचते.
४) तो आज यशस्वी आहे.
५) निंदा; आपण आपले काम करत रहावे.
६) आई मात्र रागावली नाही.
७) नृत्यास सुरुवात केली.
८) तिला फार अस्वस्थ वाटत होते.
९) गर्वाचे घर खाली असते.
१०) कामाला सुरुवात केली.
११) एक तासभर अभ्यास करतो.
१२) मित्रांबरोबर फिरावयास जातो.
१३) पाऊस सुरु झाला.
१४) मला यायला उशीर झाला.
१५) आपण कायम खरे बोलावे.

© SHETH Publishing House

# ८. विरामचिन्हे

**प्र.१ खालील वाक्यात विरामचिन्हांचा उपयोग करुन वाक्ये पुन्हा लिहा.**

१) हिमालय, आरवली, विंध्य हे भारतातील पर्वत आहे.
२) ढग खुप गर्जत होते; पण पाऊस पडला नाही.
३) 'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला', असे म्हणून तोंड गोड करतात.
४) आईने दिवाळीत लाडू, चकल्या, शेव, अनारसे, चिवडा, हे सर्व पदार्थ केले.
५) वा! छान नाव आहे तुझं.
६) शास्त्रीजीनी 'जय जवान' हा मंत्र दिला.
७) "तुझी आई आजारी आहे, खरं ना"? गुरुजीनी प्रेमळपणे विचारले.
८) शैलेंद्र ओरडला, "सुवर्णा बाहेर ये."
९) गणेश आईला म्हणाला, "मी कधीही चुकीचे वागणार नाही."



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

१०) 'भारत माता की जय!' -आपले सैनिक रणगर्जना करीत होते.

११) तिने विचारले, काय झाले चिन्नमा?

१२) आणि नाही मिळाली तर? रामोजीने हसून विचारले.

१३)"आई एवढ्याशा पैशानं तिचं कसं भागेल?"

## ९. लिंग

**प्र.१ खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) पाहुणी | २) काकू | ३) आजोबा | ४) भक्त | ५) बहिणीस |
| ६) आई | ७) माझी | ८) शिक्षिका | ९) पंडित | १०) विद्वान |
| ११) पुरूष | १२) कर्मयोगिनी | १३) साधु | १४) रेडा | १५) सूर्यकन्या |
| १६) धाकटी | १७) सासु | १८) तुझा | १९) माणसे | २०) पुस्तक |
| २१) पृथ्वी | २२) फुगेवाली | २३) मुलींना | २४) ऊन | २५) कुत्री |
| २६) नदी | २७) गुराखीण | | | |

**प्र.२ खालील शब्दांचे वर्गीकरण करुन तक्ता पूर्ण करा.**

| पुल्लिंग (तो) | स्त्रीलिंग (ती) | नपुंसकलिंग (ते) |
|---|---|---|
| कळस, सदरा, रस , दगड, रानमेवा, मोबाईल, गड, पायथा, तारा, निसर्ग खाऊ | किर्ती, शाळा, नानेटी, सहल, धरती, बाटली, कुस्ती, सुट्टी, समई, विधवा, शेळी | ज्ञानमंदिर, गाठोडे, अंगण, शेत, वर्तमानपत्र, अभयारण्यगवत, झाड, वसतिगृह, तोरण, बक्षीस |

# विभाग २ - भाष्याभ्यास

## ४. म्हणी

**प्र.१ खालील म्हणी पूर्ण करुन लिहा.**

| | | |
|---|---|---|
| १) बरसेल काय. | २) चार दिवस सूनेचे. | ३) त्याची वाजवावी टाळी. |
| ४) पाणी चाखी. | ५) साजरे. | ६) पाने तीन. |
| ७) मागच्यास शाहणपण. | ८) कान पीळी. | ९) माती. |
| १०) तो वजीर. | ११) त्याला देव देणार. | १२) जनाचे,करावे मनाचे |
| १३) वैद्य मरो. | १४) तळे साचे. | १५) काम. |

## ५. जोडशब्द

**१) 'प्राणदाता' या शब्दाप्रमाणे खालील शब्दांना 'दाता' जोडून शब्द तयार करा:**

| | | | |
|---|---|---|---|
| १) अन्नदाता | २) करदाता | ३) जन्मदाता | ४) रक्तदाता |
| ५) धनदाता | ६) वरदाता | ७) जीवनदाता | ८) जलदाता |



THIS IS A SAMPLE PDF

© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF

२) खालील शब्दांच्या आधी 'प्रति' शब्द जोडा: जसे - 'प्रतिध्वनी'

१) प्रतिवर्षी २) प्रतिक्षण ३) प्रतिकार ४) प्रतिदिनी

५) प्रतिमास ६) प्रतिबिंब ७) प्रतिपालक ८) प्रतियोगिता

### ६. उपसर्ग

**प्र.१ 'बे' हा उपसर्ग लावून खालील शब्द तयार करा व लिहा.**

१) बेजबाबदार २) बेइमान ३) बेशिस्त ४) बेरोजगार ५) बेपर्वा

६) बेदरकार ७) बेनामी ८) बेफिकीर

## विभाग ३ - लेखन विभाग

### ३. बातमी लेखन

**१. खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्र.१ कोण ते लिहा.**

अ) प्रा. अरुण फडके आ) इयत्ता ८ वी ते १० वी च्या एकूण २३५ विद्यार्थ्यांनी व काही पालक

इ) संस्था - एडिट मित्र ई) श्री. अनिल परब

**प्र.२ उत्तरे लिहा.**

अ) विद्यार्थ्यांची व पालकांची संख्या-२३५ विद्यार्थ्यांनी व काही पालक

आ) कांदिवली येथील 'मंथन विद्यामंदीर" इ) ७ मे ई) मराठी

**प्र.३ कार्यशाळेत शिकवलेले घटक** - वाक्यरचना, व्याकरण, तत्सम व तद्भव शब्द

**२. खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्र.१ कोण ते लिहा.**

अ) प्रबोधन क्रिडांगण आ) नगरसेवक श्री. तुषार पटेल

इ) श्री. कौस्तुभ अधिकारी ई) ११ डिसेंबर

उ) गोळा फेक ऊ) ४०० मी रिल रेस ए) मनोज बागवे

**प्र.२ विजेत्यांना मिळालेली बक्षीसे** - सुवर्ण पदक, रौप्य पदक, कांस्य पदक, प्रमाणपत्रे

**३. खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्र.१ उत्तरे लिहा.**

अ) जपान आ) २-१ इ) रशिया ई) शिन्जी कागावा

### ५. सारांश लेखन

१. 'प्रेम करा, प्रेम करा', हा जागतिक उपदेश चालतो व प्रेम केल्याने आनंद वाढतो. पण प्रेम करणे एवढे सोपे नसते, कारण माणसाचा स्वभाव स्वार्थी असतो. पण माणसाने आपल्या स्वार्थऐवजी समोरच्या माणसाचे गुण पहायला शिकले पाहिजे. दुसऱ्या बद्दल आदर वाढला तरंच आपण प्रेम करु शकतो.

© SHETH Publishing House



THIS IS A SAMPLE PDF

THIS IS A SAMPLE PDF

## ६. जाहिरात लेखन

**१. खालील जाहिरात वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्र.१ उत्तरे लिहा.**

अ) संजीवन क्लासेस आ) ३ महिने

इ) ८ ते ११ ई) २५

उ) संगणक क्लास ऊ) दूरध्वनी - २४८७ ०२०४

ए) माहिम, मुंबई.

**प्र.२** श्रीमती माया परांजपे यांच्या मुलाला संजीवन क्लासमुळे नोकरी लागली व त्याने त्याचा पहिला पगार त्यांना दिला. त्यामुळे अनुभव चांगला आला.

**प्र.३** हप्त्याने पैसे भरण्याची सोय, तज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन, इंग्रजी व मराठीतून शिक्षण, ९०% व्यवसाय व नोकरीची संधी

**२. खालील जाहिरात वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्र.१ उत्तरे लिहा.**

अ) आठवले विद्यालय आ) उन्हाळ्याच्या सुट्टीत इ) कोकाटे इंग्रजी संभाषण वर्ग

ई) इंग्रजी संभाषण वर्ग उ) औरंगाबाद

**प्र.२ कोकाटे इंग्रजी संभाषण वर्ग यांच्यासाठी -** गृहिणी, मराठी माध्यमातील विद्यार्थी

**प्र.३** रमाबाई आपल्या मुलाच्या शाळेत पालक सभेसाठी गेल्या होत्या. शाळेतल्या बाई फाडफाड इंग्रजी बोलत होत्या; पण रमाबाईंना ते समजत नव्हते, म्हणून त्या निराश होत्या.

**प्र.४ कोकाटे इंग्रजी संभाषण वर्ग -** या वेळेत - १० ते १, फी - रु.५००

## ७. सूचना फलक

**१. विषय : तुमच्या शाळेत बालदिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्यासाठी एक सूचना फलक तयार करा.**

दि. ३-११-२०___

ज्ञानसंपदा शाळेतर्फे, बालदिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्यात विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

त्याच्याबद्दल अधिक माहिती पुढिल प्रमाणे:-

दिवस : बुधवार

तारीख : १४/११/२०___

वेळ : सकाळी १० वाजता.

इच्छुकांनी आपली नावे १०/११/२०___ या तारखेपर्यंत द्यावी.

x



© SHETH Publishing House

THIS IS A SAMPLE PDF